रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ५१। पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २७ जुलै २०२५

किंमत ४ ₹

## तुळजाई मासेमारी बोटीला जलसमाधी

**रायगड :** उरण करंजा येथील मनोहर गणपत कोळी यांच्या मालकीच्या तुळजाई नावाच्या मासेमारी करणाऱ्या बोटीला खांदेरी किल्ल्यानजीकच्या समुद्रात कलंडून जलसमाधी मिळाली. या बोटीतील आठ जणांपैकी पाच जण सुखरूप असून, तीन जण बेपत्ता असल्याची माहिती प्रशासनाने दिली. करंजा येथून तुळजाई मासेमारी बोट सकाळी मासेमारीसाठी निघाली होती. हवामान खात्याने सागरी किनारपट्टीवर वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्याचबरोबर जिल्हा प्रशासनाने मच्छिमार बांधवांना खोल समुद्रात मासेमारीला जाण्याबाबत सावधगिरीचा इशारा दिला होता. तरीदेखील भरपावसात लाटांचा मारा सहन करीत करंजा येथील मनोहर कोळी यांची पान ४ वर




# भीषण अपघातात एक ठार, २१ जखमी

**■ मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर कंटेनरचे ब्रेक फेल ■ वीस ते पंचवीस गाड्यांना उडवले**



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शनिवार, दि. २६ जुलै रोजी एक विचित्र पण भयानक अपघात झाला. एक ब्रेक फेल झालेल्या ट्रेलरने जवळपास पंचवीस वाहनांना ठोकर मारली. या अपघातात २१ जण जखमी, तर एक महिला ठार झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर किलोमीटर ३९ म्हणजे नवीन बोगद्याच्या अलीकडे एका ट्रेलरचे ब्रेक फेल झाले. दरम्यान, महामार्गवर तीव्र उतार असल्याने त्याचा वेग वाढला. तसे त्या ट्रेलर चालकाने स्वतःचा जीव वाचवण्यासाठी पुढे जात असलेल्या एका स्कॉर्पिओ गाडीला धडक दिली. पण, तो काही थांबाला नाही. उलट, समोर चालणाऱ्या प्रत्येक वाहनाला तो धडक देत पुढे जाऊ लागला.

नवीन बोगदा ते फुडमॉल या अडीच-तीन किलोमीटरच्या रस्त्यात त्या कंटेनरने विविध कंपन्यांच्या कार, ट्रक, कंटेनर, मिनिबस यांना ठोकर मारल्या, तर काही वाहने विशेष करून कार एकमेकांवर आदळल्या. घटनेची माहिती मिळताच पोलीस, आयआरबीची देवदूत यंत्रणा, हेल्प फाऊंडेशनचे सदस्य, पोलीस तेथे तात्काळ पोहोचले. या अपघाताने मुंबई लेन पूर्ण बंद होऊन वाहतूक कोंडी झाली होती. हेल्प फाऊंडेशनच्या सदस्यांनी तात्काळ जखमींना वाहनाबाहेर काढून उपचारासाठी खोपोलीच्या रुग्णालयात हलवले.

जवळपास एकावीस प्रवासी जखमी झाले असून, त्यातील नऊ जणांना पुढील उपचारासाठी पनवेलच्या एमजीएम रुग्णालयात पाठवण्यात आले. महामार्गावरील अपघातग्रस्त वाहने युद्धपातळीवर बाजूला काढून मुंबई लेन पोलिसांनी वाहतुकीसाठी खुली केली.









कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in
रविवार, दि. २७ जुलै, २०२५



अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ जुलै

१) श्री.द्वारकानाथ वामन नाईक मु.आक्षी, अलिबाग, २७-७-१९४४

२)श्रीम.लिस्सी के.एस.पुष्पगंधन मु.वेश्वी, अलिबाग २७-७-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**श्री.डुंगरशी लालजी शाह, वाढदिवस अलिबाग**

# बोटींवर कारवाई; मच्छिमार चिंतेत

## • नव्या हंगामातील डिझेल अनुदान मिळणार का?: मच्छिमारांचा सवाल

**। उरण । वार्ताहर ।**

**विविध कारणांनी मच्छिमारांच्या बोटींवर करण्यात आलेल्या कारवाईमुळे येथील मच्छिमार नव्या मासेमारी हंगामात शासनाच्या डिझेल अनुदानापासून वंचित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मच्छिमारांमध्ये असंतोष ही निर्माण झाला आहे. १ ऑगस्ट पासून तब्बल ६१ दिवसांच्या पावसाळी बंदीनंतर मासेमारीला सुरुवात होणार आहे.**



यासाठी पूर्वतयारी सुरू झाल्याने मोरा, करंजा, ससुनडॉक, कसारा आदी बंदरात मच्छीमार बोटींची आणि मच्छिमारांची लगबग सुरू झाली आहे. यामुळे या बंदरात मच्छिमारांची गर्दी झाली आहे. पावसाळी मासेमारी बंदीनंतर एक ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या मासेमारीसाठी मच्छिमार आसुसलेले आहेत. मात्र, मच्छिमारांना मासेमारी करणाऱ्या बोटींसाठी शासनाकडून देण्यात येणारा डिझेलचे अनुदान वेळेत उपलब्ध करून दिला जात नाही. दरवर्षी मच्छिमारांची कायम तक्रार असते. एक ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या राज्यातील खोल समुद्रातील मासेमारीसाठी मच्छिमार बोटींना शासनाकडून वेळेत डिझेल कोटा दिला जाईल, अशी ग्वाही राज्याचे मत्स्यव्यवसाय विभागाने दिली आहे. या विषयावर येत्या दोन-चार दिवसांतच बैठक घेण्यात येणार आहे. मच्छिमारांना डिझेल कोटा वेळेत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाकडून डिझेलवरील अनुदान दिले जात नाही. त्यामुळे लाखो रुपये थकीत राहतात. वेळेत अनुदान न मिळाल्याने याचा मासेमारी व्यवसायावर परिणाम होतो. यात विभागाकडून मासमारी बोटींवर कारवाई केली जात आहे. त्यासाठी लाखो रुपयांचा दंड आकाराला जात आहे. तर दुसरीकडे कारवाई करण्यात आलेल्या बोटींना डिझेल अनुदानापासून वंचित रहावे लागत असल्याचे मत करंजा येथील मच्छिमार विनायक पाटील यांनी व्यक्त केले आहे. त्याचप्रमाणे अनेक बोटींना वेळेत मच्छिमारांना कोटा मिळत नाही. त्यामुळे शेकडो मच्छिमार शासकीय डिझेल कोटा मिळण्याची वाट न पाहता बाहेरून मिळणारे महागडे डिझेल खरेदी करून मासेमारीसाठी रवाना होतात. चढ्या भावाने खरेदी केलेल्या डिझेलमुळे मच्छिमारांचे आर्थिक नुकसान होते. शासनाच्या कारभाराबाबत मच्छिमारांत नेहमीच नाराजीचा सूर उमटतो.



# अतिवृष्टीमुळे भवानी नडगांवमध्ये घर कोसळले

## • सुदैवाने आजी आणि नातू बचावले.

## • नागरिकांमध्ये व्यक्त होतेय हळहळ

**। महाड । वार्ताहर ।**

मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्यात थैमान घातले असुन ढगफुटी सदृश्य पाऊस आल्याने जिल्ह्याभरात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. तर भवानी नडगांव येथे कविता कृष्णा घुरूप यांचे अतिवृष्टीमुळे घर कोसळले, यामध्ये घरातील व्यक्ती सुदैवाने बचावली असून, घराचे मात्र प्रचंड नुकसान झाले आहे.

महाड तालुक्यातील भवानी नडगांव या गावात शुक्रवारी सकाळी ९.१५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. कविता कृष्णा घुरुप (वय ६१) आणि श्लोक निलेश घुरूप (८ वर्ष) असे या दुर्घटनेतून बचावलेल्या आजी आणि नातवाचे नाव आहे. अचानक आलेला पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे घराचे छत व भिंत अचानक कोसळले. घर कोसळल्याच्या मोठ्या आवाजाने गावातील ग्रामस्थ महिला नागरिक मदतीसाठी धावले आणि बळीराम सखाराम घुरूप यांच्या घरातील कुटुंबाला तात्पुरते सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले.

ही घटना जर रात्री झाली असती तर आम्ही दोघे दगावलो असतो अशी प्रतिक्रिया कविता घुरूप यांनी व्यक्त केली.

जीव तर वाचला परंतु घुरुप कुटुंबाचे जीवन विस्कळीत झाले आहे.कविता घुरूप यांचा मुलगा निलेश कृष्णा घुरूप यांचे सात वर्षांपूर्वीच निधन झाले होते. तेव्हापासून वयोवृद्ध महिला कविता घुरूप आणि सून निकिता घुरूप यांना जगण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. निलेश घुरूप यांच्या अकाली जाण्याने त्यांची पत्नी निकीता निलेश घुरूप या महिलेनी अडचणींचा सामना करून श्लोकच्या उज्वल भविष्यासाठी त्याला आजीकडे गावी नेण्यात आले. आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे घर साधे होते. सतत दोन दिवस पडत असलेल्या पावसाच्या थैमानामध्ये घराचे अतोनात नुकसान झाले आहे.

# बेलापूर परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त अमित काळे

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत नव्याने तिसरे (बेलापूर) परिमंडळ स्थापन करण्यात आल्यामुळे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पोलीस उपायुक्तांच्या बदल्या केल्या आहेत.

गुन्हे शाखेचे उपायुक्त अमित काळे यांची नव्याने स्थापन झालेल्या बेलापूर (२) परिमंडळाचे उपायुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर वाशी आणि पनवेल परिमंडळाचे उपायुक्त कायम ठेवण्यात आले आहेत.

दरम्यान, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्वात क्रीम पोस्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्त पदी पोलीस आयुक्त भारंबे यांनी अद्याप कोणाची नियुक्ती न केल्यामुळे या पदावर आपली वर्णी लागावी म्हणून सध्या नवी मुंबई आणि नवी मुंबई बाहेरील पोलीस उपायुक्तांमध्ये चढाओढ लागली आहे.



राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर गेले असल्यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या उपायुक्त पदी अद्याप कोणा अधिकाऱ्याची नियुक्ती होऊ शकलेली नाही.

गृह विभागात ज्याचा वशिला मोठा त्याची लॉटरी लागणार असल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात साईड पोस्टींगवर कार्यरत असलेले उपायुक्त देखील गुन्हे शाखेच्या उपायुक्तपदी आपली वर्णी लागेल, या आशेवर बसले आहेत. तर नवीन परिमंडळ स्थापित झाल्याने आणखीन २ सहायक पोलीस आयुक्तांची नवी मुंबईत नियुक्ती होणार आहे.

परिमंडळ-१ वाशी मधील पोलीस स्टेशनची संख्या आता ७ करण्यात आली आहे. यात रबाले विभाग सहाय्यक पोलीस आयुक्तांची वाढ होणार आहे.

त्यांच्या अधिपत्याखाली रबाले, रबाले एमआयडीसी, कोपरखैरणे या ३ पोलीस स्टेशनचा समावेश असणार आहे. तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त वाशी यांच्या अधिपत्याखाली वाशी, एपीएमसी, तुर्भे आणि सानपाडा या ४ पोलीस स्टेशनचा समावेश असणार आहे.

तर नवीन परिमंडळ-२ बेलापूर मधील पोलीस स्टेशनची संख्या ८ करण्यात आली आहे.

यात बेलापूर सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या अधिपत्याखाली सीबीडी, एनआरआय, नेरुळ आणि प्रस्तावित विमानतळ या ४ पोलीस स्टेशनचा समावेश आहे. तर पोर्ट विभागाच्या अधिपत्याखाली उलवा, न्हावा-शेवा, उरण आणि मोरा सागरी या ४ पोलीस स्टेशनचा समावेश असणार आहे.

त्याचबरोबर परिमंडळ - ३ मधील पोलीस स्टेशनची संख्या ७ होणार असून यात खारघर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांची भर पडणार आहे. त्यांच्या अधिपत्याखाली खारघर, कळंबोली, कामोठे आणि तळोजा या ४ पोलीस स्टेशनचा समावेश असणार आहे.

# अज्ञात त्रिकुटाने एकाला लुटले

**। पनवेल । वार्ताहर ।**

अज्ञात त्रिकुटाने एका इसमाकडे असलेले दोन लाख रुपये रोख रक्कम व इतर कागदपत्रे असा ऐवज जबरीने खेचून पसार झाल्याची घटना पनवेल शहरातील माया बार समोरील रस्त्यावर घडली आहे.

सुर्यकांत जाधव (४८ रा.कर्जत) हे त्या ठिकाणावरुन जात असताना अज्ञात त्रिकुटाने आपसात संगनमत करून त्यांच्याकडे असलेली रोख रक्कम व इतर महत्वाची कागदपत्रे असा मिळून जवळपास २ लाख रुपये किंमतीचा ऐवज जबरीने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# डाक विभागात आयटी २.० प्रणाली

**। रायगड । वार्ताहर ।**

भारत सरकारच्या डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सुविधामध्ये मोठे बदल घडवून आणण्याचे सरकारने ठरविले आहे. त्याकरता डाक विभागात आयटी २.० या संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. या प्रणालीमुळे डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणारी सेवा ही अचूक, जलद व ग्राहकाभिमुख होईल.

या आयटी २.० प्रणालीची अंमलबजावणी ही ४ ऑगस्ट २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील सर्व डाक कार्यालयात (प्रधान डाकघर, उपडाकघर, शाखा डाकघर) होणार आहे. याकरिता ही अत्यंत महत्वाची प्रक्रिया असते जी २ ऑगस्ट २०२५ (शनिवार) रोजी केली जाईल. या कारणांमुळे रायगड जिल्ह्यातील डाक कार्यालयासंबधित सर्व कामे ही ०२ ऑगस्ट २०२५ (शनिवार) रोजी बंद राहतील.

सर्व ग्राहकांनी त्यांची डाक कार्यालयासंबधित जी काही तातडीची कामे आहेत. ३१ जुलै २०२५ पर्यंत पूर्ण करून घ्यावीत. ग्राहकांच्या हितासाठी व त्यांना अचूक, जलद व ग्राहकाभिमुख सेवा मिळावी याच उद्देशाने हे सर्व प्रयत्न केले जात आहेत. सर्व ग्राहकांनी याची कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

# धबधब्यावर अडकलेल्या तरुणाची सुटका

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघर मधील पांडवकडा धबधब्यावर पाण्याचा प्रवाहात अडकलेल्या तरुणाची अग्निशमन जवानांनी सुटका केली आहे. धबधब्यावर अडलेल्या तरुणाचे नाव विकास पांडे असून तो खारघरचा रहिवासी आहे. दरम्यान, नियम धाब्यावर बसवून धबधब्यावर जाणाऱ्या पर्यटकांवर पोलिसांनी योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

खारघर परिसरातील धबधबा, तलाव परिसरात पोलिसांकडून पावसाळी पर्यटनासाठी मनाई करण्यात आली असून धबधब्याकडे जाणाऱ्या रस्त्यांवर मनाईचे फलक देखील लावले आहे. असे असूनही खारघर मधील २५ वर्षीय युवक विकास पांडे पांडवकडा पांडवकडा धबधब्यावर पाण्यात भिजण्याचा आनंद घेण्यासाठी गेला होता. दरम्यान, दुपारी डोंगरावर झालेल्या मुसळधार पावसामुळे सदर तरुण नाल्याच्या मोठ्या प्रवाहात अडकल्याची माहिती खारघर अग्निशमन जवानांना मिळताच जितेंद्र राजपूत, केतन पाटील, गुरुनाथ तांडेल, कुणाल पाटील, निशिकांत पाटील, विकास सूर्यवंशी, गोविंद गडगे, आदि जवानांनी अनेक अडचणी मात करुन सदर तरुणाला सुखरुप बाहेर काढले.

# चोरी करणाऱ्याला घेतले ताब्यात

**। पनवेल । वार्ताहर ।**

तक्का गाव येथील साईबाबा मंदिर आणि चिंचपाडा येथील विठ्ठल मंदिरात चोरी करणाऱ्या चोराला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. राहुल मोरे असे त्याचे नाव आहे. पनवेल मधील मंदिरात चोरी करण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. चोरटे मंदिरातील दानपेट्या फोडून त्यातील रक्कम लंपास करत आहेत. यापूर्वी देखील चोरांनी मंदिरातील दानपेटी फोडल्या आहेत त्यातील आरोपींना पोलिसांनी अटक केली. तक्का गाव येथील श्री साईबाबा मंदिर येथे चोरी करून ७ हजार रुपये रोख रक्कम तसेच विठ्ठल मंदिरात चोरी करून एकूण ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ट्युबक्राफ्टमध्ये मशीन चोरणारी टोळी गजाआड

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील ट्युबक्राफ्ट कंपनीमधून लाखो रुपयांच्या मशीनची चोरी करणाऱ्या टोळीस माणगाव पोलीसांनी अटक केली आहे.

२२ फेब्रुवारी २०२५ रोजी फिर्यादी यांच्या कंपनीचे शटर तोडुन कंपनीमध्ये प्रवेश करून सुमारे ३३,१०,००० रूपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यानी चोरी केला होता.

गुन्ह्यातील आरोपी मंगेश रविंद्र पवार यास अटक करण्यात आली. आरोपीकडे सखोल विचारपुस करून इतर आरोपीत व त्याचे साथीदार विकास दत्ता पवार, समिर भिम पवार,दिनेश उर्फ बबलू बबन घोगरेकर, आकाश हरीश्चंद्र पवार, चंद्रकांत



इक्का जाधव यांनी डिसेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ अशी सलग तीन महीने सदर कंपनीचे शटर उचकटुन कंपनीमध्ये घुसून कंपनीतील मशनरीची तोडफोड करून कंपनीतील महागडे कॉपर वायर, अल्युमिनीयम वायर, डाय, वेल्डींग मशीन, ट्युलींग मशीन इ. साहित्य चोरी केले.

याबाबत पोलीस स्टेशनची दोन पोलीस पथके तयार करुन रोहा, कोलाड, पाली, महाड परीसरात गुन्हा करणाऱ्या सर्व आरोपीतांचा शिताफीने शोध घेवुन गुन्ह्यातील ५ आरोपी यांना दिनांक २३ जुलै रोजी अटक करण्यात आली. या गुन्ह्यातील एकुण ३७९००००/- रूपये किमतीचा मुद्देमाल माणगाव पोलिसांनी हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी माणगांव विभाग पुष्कराज सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निवृत्ती बो-हाडे, सपोनि भैरु जाधव, सपोनि बेलदार, पो. उप. निरीक्षक सुरेश घुगे, पोहवा फडताडे, पोहवा घोडके, पोशी शिर्के, पोशी मुंडे, पोशी दहिफळे, पोशी पवार यांनी केली.

# शिष्यवृत्ती परीक्षेचा टक्का आणखी वाढविणार

## • गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांचे प्रतिपादन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेतील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरला पाहिजे आणि तालुक्याचा टक्का वाढला पाहिजे यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.त्याचवेळी नाविन्यपूर्ण उपक्रमांमधून कर्जत तालुक्याचे नाव वरच्या पातळीवर नेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन तालुका गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांनी केले.नेरळ येथील केंद्र निहाय शिक्षण परिषदेत गटशिक्षण अधिकारी बोलत होते.

जिल्हा परिषद स्तरावरील शिक्षक यांना अधिक सजग करण्यासाठी शिक्षण परिषद आयोजित केल्या जात असतात. नेरळ केंद्राची शिक्षण परिषद कन्याशाळेत आयोजित करण्यात आली होती.त्यावेळी तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री साई ट्रस्टकडून अनिल कवठेकर हे उपस्थित होते. शिक्षण परिषदेच्या निमित्ताने शिक्षक वर्गासाठी व्यक्तिमत्व विकास शिबीर आयोजित केले होते.

याप्रसंगी श्री साई ट्रस्टचे संचालिका राधिका घुले,शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी देविदास जाधव,केंद्र प्रमुख रवींद्र सोनावळे,आयोजक शाळेचे मुख्याध्यापक भास्कर थोरवे,शालेय व्यवस्थापक समिती अध्यक्ष मोहिते, ग्रामपंचायत माजी सदस्या उमा खडे आणि माणगाव तर्फे वरेडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप खडे आदी प्रमुख उपस्थित होते.या शिबिरात अनिल कवठेकर यांनी शिक्षक वर्गासाठी आयोजित केलेल्या व्यक्तिमत्व विकास शिबिरात बोलताना विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी आवश्यक असे कोणते बदल करावेत याबाबत माहिती दिली.शिक्षण परिषदेचे निमित्ताने साई ट्रस्ट नवी मुंबई आणि स्पेशलिटी रेस्टॉरंट लिमिटेड मुंबई यांच्या सहकार्याने नेरळ केंद्रातील जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षकांना व्यक्तिमत्व विकास या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणामध्ये सर्व शिक्षकांना सद्यस्थितीत आपल्या व्यक्तिमत्व विकासाची आवश्यकता आहे हे उदाहरणाद्वारे आपल्या व्याख्यानातून कवठेकर यांनी कथन केले.

# गोसेवकांनी वासराला दिले जीवदान

**आगरदांडा :** मुरुड शहरातील गोल बंगला रस्त्यावरील रात्रीच्या वेळी अज्ञात भरधाव वाहनाने गाईच्या वासराला उडवल्याने गाईचा वासरू जखमी झाले होते. दुसऱ्या दिवशी शहरातील गोसेवक ऋषिकेश दांडेकर, विरेंद्र गायकर व रोहन दिघे यांना वासरू पडलेल्या परिस्थिती दिसुन आले. गोसेवक यांनी शहरातील पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन डॉक्टर राम लाडगे यांची भेट घेऊन जखमी झालेल्या गाईच्या वासरांची तपासणी करुन औषधोपचार केले. वासराने डोळे उघडले असून वासरु ठणठणीत बरं झालं आहे.

# पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक योजनेचा अर्ज सादर करण्यासाठी सामान्य सुविधा केंद्र विभागास प्रति शेतकरी ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निर्धारित केले असून शेतकऱ्यांनी विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क अदा करू नये. विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलैपर्यंत आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

पीक विमा योजना भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे. खरीप हंगामातील भात, नाचणी या अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेतलेले सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी अ‍ॅग्रीस्टीक नोंदणी क्रमांक, ७/१२ उतारा, आधार संलग्न बँक पासबुक, आधार कार्ड आणि पिक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज भरून सहभागी व्हावे . याशिवाय सामान्य सुविधा केंद्र किंवा पोर्टल वरून अर्ज भरता येईल. ई-पीक पाहणी, विमा घेतलेले पीक यात तफावत असल्यास विमा अर्ज रद्द होईल. भरलेला विमा हप्ता जप्त होईल. एखादया अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान ५ वर्षे काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही. पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के असुन भातपिकासाठी विमा संरक्षित रक्कम हेक्टरी ६१००० तर विमा हप्ता रक्कम ४५७ रुपये प्रति हेक्टरी आहे. नाचणी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम हेक्टरी ४०००० रुपये असुन विमा हप्ता रक्कम १०० रूपये प्रति हेक्टरी आहे. शेतकऱ्यांना अधिक माहिती हवी असल्यास तालुका कृषि अधिकारी मुरुड येथे संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांचा निरोप समारंभ संपन्न

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील सन २०२४-२५ या वर्षांमध्ये सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांसाठी नुकतीच पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने उरण पंचायत समितीच्या सभागृहात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

सुरुवातीला सेवानिवृत्त शिक्षक ह.भ.प.राजा पाटील यांनी गणरायाच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत यांनी प्रास्ताविकांमध्ये उरण तालुका शिक्षण विभागाचा हा शिक्षकांसाठीचा पहिलाच कार्यक्रम आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने राबवत आहोत. अनेक बंधू-भगिनींनी आपली सेवा या शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात केली.त्यांचा सन्मान होणे. हा माझा मानस होता आणि तो सत्यात उतरवण्यासाठी पंचायत समिती व शिक्षक बंधू भगिनी यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम करण्यात आला. त्याबद्दल तालुक्यातील तमाम शिक्षक बंधू भगिनींचे मी अभिनंदन करते.

या कार्यक्रमाला गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. उर्वरित शाळांचे मुख्याध्यापक यांना देखील शैक्षणिक क्षेत्रातील १८ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षकांमधून नरेश मोकाशी, राजा पाटील, उर्मिला पाटील, चिर्ले येथील केंद्रप्रमुख गोपाळ पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख मान्यवर म्हणून कक्ष अधिकारी धाटावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

शिक्षणासारख्या पवित्र ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचा आज गौरव करण्याचे मला भाग्य मिळाले असे गौरवोद्गार काढून सेवानिवृत्त व सेवेत असणाऱ्या गटशिक्षणाधिकारी अधिकारी निर्मला घरत यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला सहकार्य करणारे महेश गावंड, कौशिक ठाकूर, राजेश कोल्हे, राजेश चोगले, अपर्णा पालकर, संजय होळकर, नीलिमा म्हात्रे, अनिल म्हात्रे, योगिता पाटील, निलम म्हात्रे, सुचिता बोरसे, शीतल पाटील व सरगर यांनी विशेष मेहनत घेतली.

# कारच्या बोनेटवर मुलीचा नृत्य

**पनवेल :** प्रशांत कॉर्नरसमोरील रस्त्यावरून जाणाऱ्या मर्सिडीज कारच्या बोनेटवर मुलीचा नृत्य करताना व्हिडिओ तयार करून तो व्हायरल केल्याचे लक्षात येताच वाहतूक पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अल्पेश आजम शेख आणि रफिक सुल्डे यांनी त्यांच्या ताब्यातील मर्सिडीज कार प्रशांत स्वीट कॉर्नर समोरील रस्त्यावरून घेवून जाताना मुलीला चालू गाडीच्या बोनेटवर उभी करून नृत्य करायला लावले. हे सगळे प्रताप खारघर वाहतूक पोलिसांच्या लक्षात येताच त्यांनी चौकशी केली असता त्यांच्याकडे गाडी चालवण्याचा परवाना नसल्याचे उघडकीस आले.

# विद्यार्थ्यांनी घेतले बाल सुरक्षेचे धडे

**। पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेणवली येथे इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी चाइल्डलाईन १०९८ या राष्ट्रीय टोल फ्री क्रमांकाबाबत प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. आनंददायी शनिवार अंतर्गत मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाने या उपक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.



बालकांच्या संरक्षणासाठी, त्यांच्यावर होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अन्याय, अत्याचार, शोषण, किंवा संकटाच्या वेळी तत्काळ मदतीसाठी चाईल्ड लाईन १०९८ हा क्रमांक सुरू करण्यात आला आहे. ही सेवा २४ तास मोफत व गोपनीय असून, संपूर्ण भारतात उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना या क्रमांकाचा उद्देश, गरज पडल्यास कधी व कसा वापर करावा, त्याचा परिणाम काय होतो याबाबत सविस्तर व समजेल अशा सोप्या भाषेत माहिती दिली गेली. त्याचबरोबर शालेय परिसरात हा क्रमांक प्रदर्शीत का केला? तसेच या बाबतीत बालसुरक्षा व्हिडीओ दाखवून याचे महत्व सांगण्यात आले. त्यासोबत इयत्ता पहिलीच्या नवीन पुस्तकावर हा क्रमांक आहे, याची पुस्तक ओळख देखील आज आनंददायी शनिवार अंतर्गत करून देण्यात आली. पहिलीच्या पुस्तकात हा हेल्पलाइन नंबर कशासाठी दिला याचे महत्व पटवून देण्यासाठी उपक्रम घेण्यात आला. त्यासोबत प्रत्यक्ष हा नंबर डायल करून त्यावर तक्रार कशी नोंदवावी याचे प्रात्यक्षिक पदवीधर शिक्षक शंकर जाधव यांनी दाखवले. यावेळी चाईल्ड लाईन विद्यार्थ्यांनी पोस्टर देखील तयार केले. या उपक्रमाचे नियोजन विषय शिक्षक रविंद्र हंबीर व उपशिक्षक गणपत वरगडे यांनी केले.

कृषीवल

रायगड, रविवार, दि. २७ जुलै २०२५

किंमत ४ ₹

## पुढील पाच दिवस मुसळधार

**मुंबई** : सध्या राज्यभरात पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यातच भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रात पुढील पाच दिवस जोरदार ते अति जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. उत्तर बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे कोकण, विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. पालघर, रायगड, भंडारा, पुणे आणि नाशिकच्या घाटमाथ्यावर रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचा आणि खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## लाडकी बहीण योजनेत नवा घोळ

मुंबई: निवडणुकीच्या तोंडावर तत्कालीन सरकारने लागू केलेल्या लाडकी बहीण योजनेमध्ये नवा घोळ समोर आला आहे. याआधी सरकारी कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ उठवला होता. आता चक्क पुरुषांनीही योजनेचे पैसे उकळल्याचे उघडकीस आले आहे. दहा महिन्यांत सरकारने तब्बल १४,२९८ पुरुषांना ८२१६ लाडकी बहीण योजनेचे पैसे वाटले. लाडकी बहीणचे पैसे लाटणारे ते पुरुष आता कारवाईच्या कचाट्यात सापडले आहेत. सरकार त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे समजते. मात्र योजनेचा लाभ देण्यापूर्वी पडताळणी का केली नाही, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

# लाडक्या भावांवर उपासमार

## युवा प्रशिक्षणार्थी योजना रामभरोसे

### रायगडसह महाराष्ट्रातील प्रशिक्षणार्थींवर बेकाराची कुऱ्हाड

### सरकारच्या भूमिकेबाबत युवांमध्ये नाराजीचे सूर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

लाडकी बहीण योजनेपाठपोठ आता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनादेखील वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. महायुती सरकारने मते मिळविण्यासाठी घोषणांचा पाऊस पाडला. आता मात्र जिल्ह्यासह महाराष्ट्रात प्रशिक्षणार्थींवर वेतनाअभावी उपासमारीची वेळ आहे. राज्यातील लाडक्या बहिणींची मते मिळविण्यासाठी, त्यांना खुश करण्यासाठी लाडकी बहीण योजनेचे दरमहा दीड हजार रुपये बँक खात्यात जमा होत असताना, लाडके भाऊ मात्र तीन-चार महिने वेतनापासून वंचित आहेत.

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत विविध अस्थापनांमध्ये लागलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना तीन महिने उलटूनही मानधन मिळाले नाही. त्यामुळे या प्रशिक्षणार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.



परिणामी, येत्या १ ऑगस्टला मागण्यांसाठी आमरण उपोषण केले जाणार आहे. ह.भ.प. तुकाराम बाबा महाराज यांच्या नेतृत्वाखाली सांगली येथील कृष्णामाई घाट येथे हा लढा सुरु केला जाणार आहे. या लढ्यात रायगडमधून दीडशेहून अधिक युवा सहभागी होणार आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली. रोजगार मिळेल या आशेने राज्यातील एक लाख ३४ हजार तरुणांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील १ हजार ६०० युवांचा समावेश आहे. १८ ते ३५ वयोगटातील युवा, युवतींची जिल्ह्यातील ग्रामपंचायत, आरोग्य केंद्र, उपकेंद्रांमध्ये डाटा ऑपरेटर म्हणून मानधनावर त्यांची नियुक्ती करण्यात आली. ऑनलाईन काम करण्यापेक्षा पान ४ वर

> युवा प्रशिक्षणार्थींचे तीन महिन्यांचे विद्या वेतन रखडले आहे. विद्या वेतन आयुक्त कार्यालयाकडून दिले जाते. आता नवीन आयुक्त आले आहेत. ही योजना समजून घेऊन कार्यवाही करण्याचे काम आयुक्तांकडून सुरू आहे.
>
> – अमिता पवार, सहाय्यक आयुक्त

> निवडणुकीपूर्वी सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिणार्थी योजना राबविण्यात आली. या योजनेत महाराष्ट्रातून एक लाख ३४ हजार युवांचा सहभाग आहे. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील एक हजार ६०० युवांचा समावेश आहे. ग्रामपंचायत, आरोग्य अशा वेगवेगळ्या विभागात डेटा ऑपरेटरपासून क्लर्क म्हणून काम केले जात आहे. सुरुवातीला विद्या वेतन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मिळत होते. आता मात्र तीन ते चार महिने होऊनदेखील वेतन दिले जात नाही. मार्च ते जुलै या चार महिन्यांचे विद्या वेतन थकले आहे. याबाबत वारंवार विचारणा केली जात आहे. परंतु, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडून फक्त आश्वासने दिली जात आहेत.
>
> – ऋषिकेश पवार, अध्यक्ष,मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिणार्थी जिल्हा संघटना

### मागण्यांवर दृष्टीक्षेप

- कायमस्वरुपी शासकीय अस्थापनेत रोजगार उपलब्ध करून मिळावा.
- कार्यरत असलेल्या अस्थापनेतील थकीत विद्यावेतन अदा करण्यात यावे.
- अस्थापनेत काम करीत असताना ओळखपत्र देण्यात यावे.
- ३५ वर्षे पूर्ण झालेल्या युवांच्या वयाची अट शिथील करावी.

## वेधक

### पानमसाल्याची वाहतूक करणारा एकजण अटकेत

**रसायनी** : मोहोपाडा बाजारपेठ परिसरात पानमसाला आणि सुगंधीत तंबाखूची वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीला रसायनी पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इको कार क्रमांक एमएमच ०५ एफव्ही ५३०५ मध्ये पानमसाला आणि सुगंधीत तंबाखूची वाहतूक केली जात होती. हे पदार्थ मानवी आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आणि अपायकारक असल्याचे माहीत असूनही आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत होता. रसायनी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संबंधित आरोपीला ताब्यात घेतले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी हे करत आहेत.

### विदेशी मद्यासह लाखोंचा मुद्देमाल जप्त

**पनवेल** : उत्पादन शुल्क विभाग पनवेल ग्रामीणने विदेशी मद्यासह अकरा लाख पंच्याऐंशी हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तीन आरोपींना अटक केली. संतोष उरथ, बिजू उरथ आणि बिनु कल्लूर अशी तिघांची नावे आहेत. उत्पादन शुल्क विभाग पनवेल ग्रामीण यांनी २३ जुलै रोजी तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत योगेश वजन काट्यासमोर पेंधर, तळोजा एमआयडीसी येथे सापळा रचला. यावेळी एका चारचाकी वाहनांमध्ये बनावट विदेशी मद्याच्या १७ बाटल्या आणि दोन मोबाईल असा एकूण पाच लाख ४४ हजार ३३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर पेंधर पान ४ वर

## पाहणी करणारा कोणी मंत्री शिल्लक आहे का?




। कोलाड । प्रतिनिधी ।

रखडलेल्या राष्ट्रीय मुंबई-गोवा महामार्गावर पावसात भयानक खड्डे पडण्यास सुरू झाले असून, प्रवाशांसह वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. एवढेच नव्हे तर, त्यात आता वाहने अडकून बंद पडत आहेत. याबाबत सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. दरवर्षी गणेशोत्सव जवळ आला की मंत्री, पालकमंत्री आणि नेतेमंडळी या रस्त्याची पाहणी करण्याचा आव आणतात. राज्यातील अनेक मंत्री तसेच काही केंद्रीय मंत्र्यांनीदेखील गेली अनेक वर्षे सुरू असलेल्या या खास राष्ट्रीय महामार्गाला पसंती देत पाहणी दौरा केला. त्यात त्यांच्या अनेक डेडलाईनदेखील फोल ठरल्या. मात्र, महामार्गाचे काम आजतागायत पूर्ण होत नसल्याने आता अधिक कोणी मंत्री या महामार्गाची पाहणी करण्यास शिल्लक राहिले आहेत का, असा संतप्त पान ४ वर

### उदंड जाहले पाहणी दौरे

मागील वर्षी मुख्यमंत्र्यांनी पाहणी केली, काही महिन्यांपूर्वी उपमुख्यमंत्र्यांनी पाहणी केली.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचा यापूर्वीदेखील अनेकदा पाहणी दौरा झाला. रायगड हद्दीतील वडखळ ते इंदापूरदरम्यान अर्धवट अवस्थेत असलेली महामार्गाची कामे, त्यात भयानक पडलेले खड्डे, नागोठणे, खांब, कोलाड आंबेवाडी नाका, तळवली तिसे या ठिकाणी अक्षरशः मार्गाची चाळण झाल्याचे पहावयास मिळत आहे.

> खड्ड्यांमुळे किती ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले, किती ठेकेदारांवर काय करवाई करण्यात आली, या महामार्गाचे काम पूर्णत्वास का येत नाही, महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांबाबत आम्ही अधिकाऱ्यावर वचक ठेवण्यात कमी पडलो का, अशी कोणतीही प्रतिक्रिया या महामार्गावर पाहणी करणारे मंत्रीमहोदयांकडून का ऐकायला मिळत नाही, हे मात्र न उलगडणारे कोडेच झाले आहे.
>
> – जयेश घावटे, सामाजिक कार्यकर्ते, कोलाड

## मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर दरड कोसळली

### मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद

। खोपोली । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात जोरदार पाऊस कोसळत आहे. परिणामी, मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे-वर शनिवारी सायंकाळी अमृतांजन पुलाजवळ मोठी दरड कोसळल्याने मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे.

रायगड जिल्ह्यात गेल्या तीन ते चार दिवसांपासून अतिवृष्टीसदृश्य मुसळधार पाऊस पडत असून, यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यातच शनिवारी मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील अमृतांजन पुलाजवळील डोंगराचा काही भाग एक्स्प्रेसवेवर कोसळला. यात दगड, माती आणि झाडांचा समावेश आहे. सुदैवाने ही दरड कोणत्याही वाहनावर पडली नसल्याने मोठी दुर्घटना टळली. परंतु, यामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे थांबवली आहे. या घटेनेची माहिती मिळताच बोरघाट पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, आयआरबीकडून दरड हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु होते. दरम्यान, यावेळी बोरघाट पोलिसांकडून वाहतूक नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते.



### तीन नक्षलवादी चकमकीत ठार

**नवी दिल्ली** : झारखंडमध्ये शनिवारी सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. या चकमकीत तीन नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. घटनास्थळाहून एक एके ४७ रायफल आणि दोन इन्सास रायफल हस्तगत करण्यात आल्या आहेत. गुमला येथील घाघरा पोलीस स्टेशन अंतर्गत लवाडाग गावाजवळ ही चकमक झाली. या चकमकीत झारखंड जन मुक्ती परिषद (जेजेएमपी) चे तीन नक्षलवादी ठार झाले. झारखंड जग्वार आणि गुमला पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. जेजेएमपीचे नक्षलवादी लवाडाग चोरलटवा गावाजवळील एका घरात लपून बसल्याची गुप्त माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती.

## गुगल मॅपच्या नादात कार पडली खाडीत

### पोलिसांच्या सतर्कतेमुळे महिलेचे वाचले प्राण

। उरण । प्रतिनिधी ।

गुगल मॅपवर दाखवलेला रस्ता नेमका कुठे संपतो, याची खात्री न करता भरधाव कार चालवणं एका महिलेच्या जीवावर बेतण्याची वेळ नवी मुंबईतील बेलापूर येथे आली होती. उलवेच्या दिशेने निघालेली कार बेलापूर खाडीपुलावर न जाता गुगल मॅपवर दाखवलेल्या सरळ मार्गानुसार थेट खाडी किनाऱ्यावर असलेल्या ध्रुवतारा जेट्टीवर पोहोचली आणि थेट खाडीत कोसळली.

ही घटना गुरुवारी मध्यरात्री म्हणजेच शुक्रवारी पहाटे एक वाजता घडली. सदर जेट्टीवर कोणताही सुरक्षा कठडा नसल्याने कार थेट पाण्यात गेली. मात्र, सुदैवाने सागरी सुरक्षा पोलिसांची





काढण्यात आली.

महिलेने पोलिसांना सांगितले की, ती गुगल मॅपवर रस्ता पाहात होती आणि पुलाऐवजी खालील रस्ता सरळ गेला असल्याने तोच योग्य समजून कार चालवली. मात्र, त्या मार्गाच्या शेवटी जेट्टी असून, पुढे पाण्यात रस्ता संपतो याची कल्पना मॅपवरून आहे, हे अधोरेखित झाले आहे.

दरम्यान, सागरी पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि प्रसंगावधानामुळे एक अनमोल जीव वाचला आहे, याबद्दल स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत. यावेळी कार्यरत असणारे पोलीस उपनिरीक्षक पान ४ वर

## जिल्हा परिषदेचा अनागोंदी कारभार

### रामेश्वर नरेंची कोकण आयुक्तांकडे तक्रार

। पनवेल । प्रतिनिधी ।

सध्या रायगड जिल्हा परिषदेमधील कोणाचा अंकुश नसल्यामुळे तेथे जावं तर अधिकारी उपस्थित नसतात. या अनागोंदी कारभाराविरोधात आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासनाचे रामेश्वर नरे यांनी संताप व्यक्त केला असून, याबाबत त्यांनी कोकण आयुक्त प्रशासन विभाग कोकण भवन येथे पत्र दिले आहे.

या पत्रात रामेश्वर नरे यांनी म्हटले आहे की, मी स्वतः जिल्हा परिषद रायगड अलिबाग येथे गेलो होतो असता तेथे एकही अधिकारी उपस्थित नव्हते. २४ जुलैला पुन्हा मी व्हिजिटला गेलो होतो, तेव्हासुद्धा अधिकारी उपस्थित नव्हते. रायगड जिल्ह्यातून खेड्यापाड्यातून कामासाठी गोरगरीब लोक येत असतात, अधिकारी जागेवर उपस्थित नसल्यास लोकांचे येणे-जाणे फुकट जाते. मी स्वतः जिल्हा परिषदला गेलो; परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आजपर्यंत भेट झाली नाही. रायगड जिल्हा परिषदेवरती जिल्हाधिकारी व्यवस्थित आदेश देत नाहीत असे दिसून येत आहे, असेच चालले तर मला पुन्हा एक वेळ रायगड जिल्हा परिषदेच्या विरोधात उपोषण आमरण उपोषण करावे लागेल.



सन २०२५ वर्षाचा आदिवासी व दिव्यांगासाठी अर्थसंकल्पदेखील व्यवस्थित बनवला नसून, याची चौकशी होऊन तो व्यवस्थित बनवण्यात यावा. पान ४ वर

छत्रपती संभाजी राजांचे स्पष्टीकरण | रायगडावरील कामांची पाहणी

## रोप-वेच्या अतिक्रमणाची जबाबदारी 'पुरातत्व'ची

। महाड । प्रतिनिधी ।

कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगडावरील अतिक्रमण हटवल्यानंतररायगडकिल्ल्यावरील पुरातन धनगर वाड्यांवरील घरे खाली करण्याबाबत पुरातत्व विभाग व वन विभागाने तेथील रहिवाशांना नोटिसी दिल्या आहे. याबाबत रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे यांना विचारले असता, त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम असेल, तर ते निघाले पाहिजे, त्याचबरोबर मी धनगर समाजाच्या पाठीशी ठामपणे आहे. परंतु, रायगड रोपवे-ने केलेल्या बांधकामाबाबत विचारले असता हे रायगड प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली नसून, याबाबत





पुरातत्त्व खात्यालाच विचारा, असे छत्रपती संभाजी राजे यांनी सांगितले.

रायगड किल्ल्यावरील प्राधिकरणामार्फत चालू असलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी छत्रपती संभाजीराजे जात होते. मात्र, मोठ्या प्रमाणावर होत असलेली पर्जन्यवृष्टीमुळे त्यांनी रायगडवर जाणे रद्द केले व त्याबाबत त्यांनी महाड येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी गप्पा मारल्या. दरम्यान, रायगड रोपेच्या अतिक्रमणबाबत त्यांना विचारले असता, हा विषय पुरातत्त्व खात्याला पूर्णपणे माहिती आहे, याबाबत मुख्यमंत्र्यांना मी सांगितलेले आहे, पुरातत्व खात्याला पूर्णपणे माहिती आहे, मी रायगड प्राधिकरणाचा अध्यक्ष म्हणून तिथे कोणतेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही, तसेच मी कोणतीही परवानगी दिलेली नाही.

रायगडवर रोपवेने केलेले अतिक्रमण रायगड प्राधिकरणाला चालत नाही, व्यक्तिगत संभाजी छत्रपतींना पण चालत नाही, हा प्रश्न माझा मुख्यमंत्र्यांना पण आहे, आणि पुरातत्त्व खात्याला पण आहे. तुम्ही आम्हाला नियम लावता हे करायचे नाही, ते करायचं नाही, दगड हलवायचा नाही. तुम्ही हा प्रश्न मुख्यमंत्री येतात, सांस्कृतिक मंत्री येतात, त्यांना विचारा, पुरातत्त्व खात्याला विचारा, असे पान ४ वर

भारतीय शेतकरी कामगार पक्ष

रायगड-अलिबाग

वर्धापन दिन

दिनांक २ ऑगस्ट २०२५

लाल सलाम

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा **शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०-०० वाजता सेक्टर नं.५/ए, गुरूद्वाराच्या बाजूला पोलीस ग्राऊंड, नवीन पनवेल** येथे **पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील** व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
सुरेश नामदेव खैरे
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# गुळगुळीत रस्ता जेसीबीने खरवडला




। महाड । प्रतिनिधी ।

महाड-दापोली राज्य मार्गावर २४ जुलै रोजी बिजघर फाटा व मांडवकर कोंड यादरम्यानचा रस्ता गुळगुळीत झाल्याने पुणे फौजी अंबवडे एसटी बस घसरून झालेल्या अपघातात बसमधील चालक, वाहकासहित आठ प्रवासी गंभीररित्या जखमी झाले होते. या घटनेनंतर या रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणाऱ्या ठेकेदाराने या परिसरातला रस्ता जेसीबी यंत्राच्या साह्याने खरवडण्यास सुरुवात केला असला तरी या रस्त्याचा दर्जा पावसाळ्यात कायम राहील का, हा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

महाड-दापोली राज्य मार्गावर २४ जुलै रोजी दुपारी पुणे फौजी अंबवडे अहिरे कोंड ही बस बीज घर फाटा ते मांडवकर कोंड यादरम्यानच्या रस्ता गुळगुळीत झाल्याने या ठिकाणी घसरून झालेल्या अपघातात एसटीतून प्रवास करणाऱ्या आठ प्रवाशांसहित चालक व वाहक गंभीररित्या जखमी झाले. या घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्या तयारीत असणाऱ्या एफएमसी कन्स्ट्रक्शन कंपनीला जाग आली असून, या मार्गावरील रस्ता ऐन पावसाळ्यात जेसीबी यंत्राच्या साह्याने खरवडण्याचा प्रकार चालू केला आहे. त्यामुळे या रस्त्याचा दर्जा ऐन पावसाळ्यात उत्तम प्रतीचा राहील का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

महाड-दापोली राज्य मार्गावर ऐन उन्हाळ्यात मे महिन्याच्या कालावधीत सुस्थितीत असणारा रस्त्यावर एफएमसी कन्स्ट्रक्शन कंपनीने डांबर मारून व त्यावर ग्रिट फवारणी केली होती. मात्र, त्यानंतर ६ मेपासून चालू झालेल्या पावसामुळे अपघातांची मालिका आज जुलै महिना संपत आला तरी मात्र अखंडपणे चालू आहे.

## पान १ वरून

## तुळजाई मासेमारी बोटीला जलसमाधी

तुळजाई नावाची बोट मासेमारीसाठी समुद्रात झेपावली होती.

शनिवारी सकाळी सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसासह लाटांचा मारा या बोटीला सहन झाला नाही. यामुळे तुळजाई मासेमारी बोट खांदेरी किल्ला परिसरातील समुद्रात कलंडली आणि या बोटीला जलसमाधी मिळाली. या बोटीमध्ये नाखवासह सात जण असे एकूण आठ जण होते. बोट बुडणार असल्याचे लक्षात येताच बोटीवरील आठही जणांनी समुद्रात उड्या घेतल्या. आठ जणांपैकी पाच जण पोहत बाहेर आले असून, ते किरकोळ जखमी आहेत. त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे.

बोटीवरील खलाशी व तांडेल बाहेर आलेले आहेत. यामध्ये हेमंत बळीराम गावंड, संदीप तुकाराम कोळी, रोशन भगवान कोळी, शंकर हिरा भोईर आणि कृष्णा राम भोईर हे पाच जण पोहत किनाऱ्यावर आले आहेत. तर, नरेश राम शेलार, धीरज कोळी आणि मुकेश यशवंत पाटील हर तीन खलाशी अद्यापही बेपत्ता आहेत, असे प्रशासनातील सूत्रांनी सांगितले. ड्रोनच्या मदतीने किनाऱ्याजवळ बेपत्ता असलेल्या तीन खलाशांचा शोध रात्री उशिरापर्यंत सुरु होता.

## पान ३ वरून

## लाडक्या भावांवर उपासमार

ऑफलाईन काम देऊन या तरुणांना राबविण्याचे काम वेगवेगळ्या विभागातून करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्य रुग्ण कक्षातील रुग्णांची तपासणी करणे, ग्रामपंचायतीमधील घरपट्टी, पाणीपट्टी तसेच इतर कामेदेखील करून घेण्यात आली. मागील चार वर्षांची प्रलंबित कामे युवांकडून करून घेतली. निवडणुकीपूर्वी ही योजना राबविली होती.

त्यावेळी दर महिन्याच्या दहा तारखेला युवा प्रशिणार्थींना विद्यावेतन दिले जात होते. बारावी उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींना सहा हजार रुपये, डिल्पोमाधारकांना आठ हजार रुपये आणि पदवी-पदव्युत्तरधारकांना दहा हजार रुपये असे विद्यावेतन देण्यात आले. आता मात्र ही योजना रामभरोसे झाली आहे. जिल्हा कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत ही योजना राबविण्यात आली. मार्च ते जुलै महिन्याचे विद्यावेतन अद्याप देण्यात आले नाही. तसेच कायम करण्याच्या आश्वासनाची पूर्ततादेखील करण्यास टाळाटाळ होत आहे. तुटपुंज्या मानधनात राबवून सरकारने तरुणांची थट्टा केली आहे. २०२४ मध्ये विधानसभा निवडणुका महायुतीकडून डोळ्यासमोर ठेवून वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा समावेश आहे. आता मात्र या योजनेचा कारभार नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे युवा वर्गात सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी आहे. जिल्हा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देण्यात आले आहे. नियमित मानधन मिळावं, मुदत वाढवून द्यावी तसेच आम्हाला नियमित करण्याची मागणी या योजनेतील लाभार्थ्यांकडून करण्यात आली आहे.

## ...कोणी मंत्री शिल्लक आहे का?

सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम करण्यासाठी अनेक ठेकेदार झाले. हा मार्ग तयार करण्यासाठी किती कोटींचा धुरळा उडाला, हे मात्र गुलदस्त्यातच आहे. कोटीच्या कोटी खर्च करूनदेखील काही ठिकाणी अपूर्ण कामांचा फटका मात्र सर्वसामान्य प्रवासी नागरिक यांना बसत आहे, तर ठेकेदाराच्या आडमुठेपणाच्या धोरणांमुळे मार्गालगतचे सर्व्हिस रोड, गटारे, लाईटची कामे आजही सुरू असल्याने ती अर्धवट कामे अपघातास कारणीभूत ठरत आहेत. याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

श्रावण सुरू झाला गणेशोत्सव जवळ आला की दरवर्षी या खड्ड्यांचे दर्शन घेण्यासाठी सदरील आमदार, खासदार, मंत्री आणि पालकमंत्री, बांधकाम मंत्री या महामार्गावर पोहोचतात, तेव्हा चोख बंदोबस्त आणि त्यांच्या चारही बाजूला अधिकारी आणि कार्यकर्त्यांचा गराडा, त्या गराड्यात मंत्र्यांनी दिलेले आदेश आणि फायली चाळत लिखापटी धावत धावत करणारे अधिकारी हे एकप्रकारे आता दिनक्रमच होऊन बसला आहे. मात्र, या खड्ड्यांबाबत नाही कुणा नेत्याला चिंता की नाही कुणा अधिकाऱ्याला त्याची काळजी, हे अनेकदा समोर आले आहे.

## जिल्हा परिषदेचा अनागोंदी कारभार

नेहमी जिल्हा परिषद, पंचायत समिती कार्यालयामध्ये गेले असता अधिकारी असले तर अधिकारी नेहमी विसी (व्हीडीओ कॉल) मध्ये आहेत असे खोटे सांगून मला भेटण्यास टाळाटाळ करीत असतात. तरी आपल्या पातळीवरती रागयड जिल्हा परिषदेचे अधिकारी हे प्रत्यक्ष कामकाजाच्या वेळी नागरिकांना सोयी-सुविधा मिळावी यासाठी उपस्थित राहण्याचे आदेश द्यावेत, ही मागणी पत्राद्वारे केली आहे.

## गुगल मॅपच्या नादात कार पडली खाडीत

हात्रे, जुमळे, जावळे, एएसआय जायकर (नौका विभाग), एएसआय रवींद्र राऊत, पो.हवा.यशवंत भोसले, पो.शि. धनवट, तसेच इंडियन रेक्स्यु फोर्सचे जवान संस्कार तास्ती, अमित, शुभम पाटील, प्रज्योत सानप, सूरज चव्हाण आदींच्या पथकाने सदर महिला चालक यांना पाण्यातून सुखरूप बाहेर काढले आहे. खाडीत पडलेली एमएच-०४-जीई-८६३६ या नंबरची ऑडी कार खाडीतून खासगी क्रेनच्या साह्याने बाहेर काढली.

## रोप-वेच्या अतिक्रमणाचा जबाबदारी 'पुरातत्व'ची

छत्रपती संभाजी राजे यांनी सांगितले." एकंदरीत, रायगड किल्ल्यावरील रायगड रोपवेने केलेल्या अतिक्रमणाला पुरातत्व विभाग पाठीशी घालत असल्याचे यातून निष्पन्न होत आहे. आता छत्रपती संभाजी राजांच्या भूमिकेनंतर पुरातत्व विभाग काय भूमिका घेते, याकडे किल्ल्यावरील रहिवासी असणाऱ्या धनगर समाजासहित रायगड किल्ला परिसरातील आम जनता या पुरातत्त्व खात्याच्या भूमिकेकडे डोळे लावून बसले आहे.

## विदेशी मद्यासह लाखोंचा मुद्देमाल जप्त

येथील एका पत्र्याच्या खोलीमध्ये जाऊन बनावट विदेशी मद्याच्या ५४ बाटल्या, विदेशी मद्याच्या ४२ बाटल्या, रिकाम्या बाटल्या, बनावट बुच, बनावट कागदी लेबल असा एकूण सहा लाख ४१ हजार २९५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही ठिकाणी मिळून ११ लाख ८५ हजार ५९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली. ही कारवाई निरीक्षक अनिल बिराजदार, दुय्यम निरीक्षक अजित बडदे, योगेंद्र लोळे, गैनीनाथ पालवे, निखिल पाटील, सचिन कदम यांनी केली.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की. आमचे अशिल यांनी मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथिल खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री.मुकुंद जयशंकर धारीया यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| २६ | ७/क | १.६०.०० | ०.५७ |
| २६ | ७/ब | १.६०.०० | ०.५७ |
| २८ | ६ | ०.३६.०० | ०.०६ |
| २७ | ५ | ०.६५.०० | ०.४२ |
| | एकुण | ४.२१.०० (१० एकर २१ गुंठे) | |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता.कर्जत,
जि.रायगड. मो.नं. ७७९८४३३८८८

सही /-
**ॲड. कैलास अनंत बासरे**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री.आनंद मुकुंद धारीया यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २७ | १० | ०.२४.०० | ०.१६ |
| २७ | ११ | ०.०३.०० | ०.०३ |
| २७ | १२ | ०.५१.०० | ०.४४ |
| २७ | ६ | ०.६५.०० | ०.५३ |
| २७ | ७ | ०.५५.०० | ०.४४ |
| २८ | १ | १.८८.०० | ०.९९ |
| २८ | १० | ०.२४.०० | ०.१९ |
| २८ | २ | ०.१५.०० | ०.१६ |
| २८ | ४ | १.०७.०० | ०.५३ |
| | एकुण | ५.३२.०० (१३ एकर १२ गुंठे) | |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता.कर्जत,
जि.रायगड. मो.नं. ७७९८४३३८८८

सही /-
**ॲड. कैलास अनंत बासरे**

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### MAHATRANSCO — E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. : 7000037095**<br>**Tender No. : EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-24/ 2025-2026.**<br>RFx e-tender for Supply of various type of Nut, bolts at various substation under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Rs. 9,87,151/-, EMD amount Rs. 9,872/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **29.07.2025, 18:00 Hrs. to 13.08.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 13.08.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **14.08.2025 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in** **Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505. Note : All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer, E.H.V.(O&M) Dn. Panvel**

### नोटीस

दिनांक :- २६/०७/२०२५

सर्व जनतेस जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे महाळुंगे खुर्द ता.मुरुड, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) श्री.मंदार काशिनाथ पाटील २) कीर्तीदा संदीप शेळके ३) शमा पविण कदम यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत हि निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे महाळुंगे खुर्द, ता.मुरुड, जि.रायगड**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| महाळुंगे खुर्द ता.मुरुड | १२३/२ | एकूण क्षेत्र ०-९२-०० | ०.५९ |

वर नमूद मिळकतीपैकी १) श्री.मंदार काशिनाथ पाटील २) कीर्तीदा संदीप शेळके ३) शमा पविण कदम यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२९-९० हे.आर., पो.ख ०-१७-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-४६-९० हे.आर. आकार ०.२४ रु. पैसे., पैकी क्षेत्र ०-२३-०० हे.आर., या मिळकतीबाबतचे

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफीस पत्ता:- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम.कॉलेज जवळ,
अलिबाग-रायगड. मो.नं. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे तळवली तर्फे घोसाळे, ता.रोहा, जि.रायगड येथिल.**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| नफिसा महंमद हनिफ नवरंगे | २०/१/अ/५ | वरकस ००-८६-००<br>पो.ख.००-१६-००<br>एकुण ०१-०२-०० | ०.७१ | खालसा |
| महंमद रफिक शरिफ नातेकर व इतर २ | २०/१/अ/४/२ | वरकस ०१-००-००<br>पो.ख. ००-०८-००<br>एकुण ०१-०८-०० | ०.९२ | खालसा |
| महंमद रफिक शरिफ नातेकर व इतर २ | २०/१/अ/६ | वरकस ००-६०-००<br>पो.ख. ००-१३-००<br>एकुण ००-७३-०० | ०.५० | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. २७/०७/२०२५

सही
**ॲड. पी.जी.दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी.विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे हॉस्पिटल जवळ, ता.रोहा,
जि.रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, आवास, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ.साक्षी सचिन गुंजाळ व श्री.सचिन हरिश्चंद्र गुंजाळ यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आवास, ता.अलिबाग, जि.रायगड | ८५२ | ६-००-०० | ६०.०० |
| | ८५३ | ६-००-०० | ६०.०० |
| | ८५४ | ५-७०-०० | ५७.०० |

अलिबाग,
दि. २६/०७/२०२५

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
M.M. Legal and Associates
MAH/5773/2006
Rituraj Plaza, Flat No.1,
Ground Floor, Shivaji Chouk
Near Gawade Optics.
Alibag Raigad.

### नोटीस

दिनांक : १४/०७/२०२५

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल सदानंद डेव्हिड यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे-नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग, | २५४८ | क्षेत्र ०-०६-००<br>पो.ख.०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-०६-०० | ०.५२ |

**वर नमुद जमिन मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत नागांव हद्दीतील घर मालमत्ता क्र.१६८३, क्षेत्र १७०५ चौ.फुट ही घर मिळकत.**

दिनांक : २७/०७/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :-फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज जवळ
अलिबाग-रायगड, मोबा.९७६७०१०९०२

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे सामाईक मालक श्री.बाळाराम पांडुरंग बदे व इतर ८ यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कळंब, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २२/४ एकुण ०१.४५.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २७/०७/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### अर्जदार तर्फे वकिल ॲड.तनिया राजेंद्र गांधी

**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायधिश (क.स्तर) सो.,यांचे कोर्टात**

दिवाणी चौ.अर्ज क्र.३९/२०२५

### जाहीर नोटीस

१) श्री.सचिन अनंत जाधव
वय वर्षे ३८, धंदा:- शेती
रा.मु.वरवठणे,
पो. ता.म्हसळा, जि.रायगड
२) श्री.संदेश अनंत जाधव
वय वर्षे ३५. धंदा :- शेती — अर्जदार
रा.मु.वरवठणे,
पो.ता.म्हसळा, जि.रायगड
(३) श्रीम.सुवर्णा रमेश मोहिते
वय वर्षे ४२, धंदा :- गृहीणी
रा.त्रीमूर्ती नगर, कल्याण रोड,
नविन कृष्णा बेकरी, डोंबिवली ईस्ट,
कल्याण, मुंबई.

**विरुद्ध**

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-वरवठणे बौद्धवाडी, पो. ता.म्हसळा, जि.रायगड येथील मयत कै.मंदा अनंत जाधव उर्फ सुमिता अनंत जाधव यांचे दिनांक १२/०४/२०१९ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वाली वारस अर्जदार क्र.१ व ३ हे आहेत. मयत कै.मंदा अनंत जाधव उर्फ सुमिता अनंत जाधव यांचा मौजे-वरवठणे बौद्धवाडी, पो.ता.म्हसळा, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधनानंतर त्याच्या पश्चात अर्जदार यांचे नाव शासकीय, निमशासकीय कार्यालयात दाखल करणे करिता अर्जदार क्र.१ व ३ हे कायदेशीर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक २४/७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता.२४/७/२०२५

सही/-
**क.लिपीक दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

सही/-
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :- मौजे तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) मंजुश्री राजेश अंभोरे<br>२) राजेश अशोक अंभोरे | २ | ४/अ/६ | २-८०-०० | २८ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक :-२७/०७/२०२५
मो.नं.८४४६८६९६७१
ई मेल:nileshmundhe029@gmail.com

### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी


■ अलिबाग मधील फिजिओथेरपी क्लिनिकसाठी पुरुष व महिला मदतनीस पाहिजेत पगार + कमीशन १०,०००/- ते १५०००/- पर्यंत मिळेल. वेलनेस फिजिओथेरपी क्लिनिक ९२२६७६६१२९.

■ दुकान गाळा विक्री करणे आहे. अलिबाग एसटीस्टँडजवळ ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## बोधकथा

वाल्या कोळी आणि रामनाम वाल्या कोळी हा मूळचा दरोडेखोर. त्याचे संपूर्ण आयुष्य लोकांना लुटण्यात गेले. अनंत पापांचे डोंगर तयार झाले. पुण्यलेषांमुळे योगायोगाने श्री नारद मुनी वाल्या कोळीच्या रस्त्यांवरून चालले असता त्यांनी नारद मुनीवर हल्ला केला. श्री नारद यांनी न घाबरता वाल्याला उपदेश केला आणि त्याला सांगितले,




तुझ्या या घोर पापांमध्ये कोणीही भागीदार होणार नाही. ज्या बायका-मुलांकरिता तू ही घोर पापे करीत आहे, ते सर्वजण तुझ्या पापांना जबाबदार राहणार नाही. हे शब्द ऐकल्यावर वाल्या कोळी श्री नारदांना म्हणाला, असे कसे होईल? मी हा जो धंदा करतो, तो माझ्या कुटुंबियांसाठी? श्री नारद यांनी वाल्या कोळीला सांगितले, मी येथेच बसतो. तू घरी जाऊन आपल्या बायका-मुलांना विचारून ये. वाल्या तसाच निघाला आणि घरी आला. त्याने आपल्या बायका-मुलांजवळ पापाविषयी विचारणा केली. तेव्हा पापाचे धनी व्हायला कोणीही तयार झाले नाही, हे वाल्या कोळीना कळून चुकले.

वाल्या कोळीच्या बायकोने स्पष्ट सांगितले, 'आमचे पोट भरणे हे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही कोणत्या मार्गाने पैसे कमवता याच्याशी आमचा संबंध नाही. मी तुम्हाला पाप करायला सांगितले नाही.' आपल्या घरातील पत्नीचे उद्गार ऐकून वाल्या कोळ्याला अनुताप झाला. तो धावत नारद मुनीकडे आला आणि त्यांचे पाय धरले. तो म्हणाला, प्रपंचाच्या आणि बायका-मुलांच्या मोहामुळे भ्रांत होऊन मी अनंत पापांचा मालक झालो आहे. आपण माझ्या डोळ्यात चांगले अंजन घातले. मी केलेल्या पापांच्या राशी पाहून मला पश्चाताप झालेला आहे. यातून आपणच मला मार्ग दाखवा. असे म्हणत वाल्या कोळीने आपल्या आपल्या अश्रुंनी श्री नारद यांचे पाय भिजविले. श्री नारद ह्यांनी हळुवारपणे त्याला उठविले. आणि सांगितले, या संबंध जगताचा स्वामी, आपल्या कर्माचा न्याय निवाडा करणारा भगवान दासाभिमानी श्री राम शरणागतांचा प्रतिपाळ करतो. तो भक्त वत्सल आहे. तो कृपा सिंधू भगवान श्रीराम करुणाघन आहे. तू केवळ रामाचे नामस्मरण करीत बस. तो तुझा सांभाळ करील.

**सद्गुरु स्वामी बोध**

श्री नारदाच्या या शब्दावर, संपूर्ण विश्वासाने, संपूर्ण भाव बलाने, निःशंक मनाने श्री राम नामाचा जप करण्यास सुरुवात केली. आणि मेरुप्रमाणे अढळ बैठक मारली. कालांतराने वाल्याचे वाल्मिकी ऋषी झाले.
वाल्मिकी ऋषींनी असे लिहून ठेवले आहे, तिन्ही जगाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य राम नामामध्ये आहे. अशा तऱ्हेने भगवंत आपलासा होणे हे दुर्लभ भाग्य आहे. हे भाग्य एक चित्ताने नामस्मरण केल्यामुळेच आपल्याला मिळते.

# महामार्गावर खड्ड्यांचे विघ्न

## ● यंदाही गणेशभक्तांचा प्रवास खड्ड्यांतूनच

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या तसेच कोकणवासियांचा सर्वात महत्त्वाचा असा सण मानल्या जाणाऱ्या गणपती बाप्पाचे आगमन काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. तरी अद्यापही काही केल्या मुंबई-गोवा महामार्गावरील खड्ड्यांचे विघ्न काही केल्या दूर झालेले नाही. कारण, मुंबई-गोवा महामार्गाची अक्षरशः दयनीय अवस्था झाली आहे. जागोजागी महामार्गावर पाणी साचल्यामुळे तलावाचे स्वरुप आले आहे. अनेक राजकीय नेते गणेशोत्सवापूर्वी हे खड्डे भरण्यासाठी गाजावाजा करत असतात. परंतु, त्याचा काहीही उपयोग होताना दिसून येत नाही.

गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याबद्दल गणेशोत्सव जवळ आला की, अनेक नेते पुढाकार घेत असतात. परंतु, दरवर्षीप्रमाणेच यावर्षीदेखील गणेशोत्सवासाठी गावाला जाणाऱ्या कोकणवासियांना खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागणार आहे. त्यातच प्रवास



करताना वाहतूक कोंडीचे विघ्नदेखील येणार आहेत. जणू काही महामार्गावरील खड्डे हे चाकरमान्यांसाठी मृत्युचे सापळे ठरत आहेत.

दरम्यान, नागोठणे ते कोलाडपर्यंत प्रवास करताना गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागणार आहे. दरवर्षीप्रमाणेच खड्ड्यांमधील कसरतीचा प्रवास हा गणेशोत्सवाच्या काळामध्ये कोकणवासियांचा चुकलेला नाही. खरं तर, यावर्षी प्रत्येक कोकणवासीय गणेशोत्सवासाठी गावाला गेल्यानंतर गणपती बाप्पाच्या चरणी एकच साकडं घालणार आहे की सरकारला जाग येऊ देत व लवकरात लवकर मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्णत्वास होऊ दे.

## भेरव अंबा नदी पुलावरून पाणी



**। पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यात शुक्रवारी (दि. २५) मुसळधार पाऊस झाल्याने भेरव गावाजवळील खुरावले फाटा येथील अंबा नदीवरील पुलावरून सकाळी पाणी वाहात होते. यावेळी वाहत्या पाण्यातून पुलाच्या दोन्ही बाजूला जीव धोक्यात घालून वाहने पाण्यातून जात होती. तसेच नागरिकदेखील चालत गेले.

सकाळी १० वाजेच्या सुमारास भेरव पुलावरून पाणी गेल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या पुलाच्या पलीकडून पाली व खोपोलीला जोडणारा रस्ता आहे. तसेच दुसऱ्या बाजूने भेरव, वाघोशी, महागाव व पेण आदी गावांकडे जाणारा रस्ता आहे. मात्र, बराच वेळ वाट पाहूनदेखील पुलावरचे

### ● प्रवाशांची सुरक्षा राम भरोसे

पाणी कमी होत नसल्याने तेथील अतिउत्साही वाहन चालकांनी आपली वाहने वाहत्या पाण्यातून नेण्याचा धोकादायक स्टंट केला. हा प्रवास धोकादायक होता, कारण पाण्याचा प्रवाह व जोर वाढला असता तर जीवावर बेतले असते. खुरावले फाटा येथील पुलावरून पावसाळ्यात नेहमी पाणी जात असते. येथील प्रवासी असुरक्षित प्रवास करीत असतात. पुलावरून पाणी जात असताना पुलाच्या दोन्ही बाजूला पोलीस किंवा होमगार्ड तैनात करण्यात यावे, तसेच वाहतूक थांबवण्यात यावी किंवा पुलाची उंची तरी वाढवण्यात यावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

## गुरेचोरीच्या घटना सुरूच

**म्हसळा :** तालुक्यात गुरे चोरीच्या आणि बिबट्याने शिकार करण्याच्या घटनांत वाढ झाली असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वर्षभरात म्हसळ्यातील अनेक शेतकऱ्यांचे शेकडो गुरे चोरीला गेली असल्याचे म्हसळा पोलीस ठाण्यात फिर्यादीवरुन सांगण्यात आले. म्हसळा येथील दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी मोहम्मद म्हसलाई यांची दुभती गाय चरण्यास गेली असता ती शोध घेऊनही गोठ्यात परत आली नाही. गाय चोरीला गेली असल्याची खात्री झाल्याने म्हसलाई यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. गाय चोरीला गेल्याचे घटनेला १३ दिवस उलटून गेले आहेत. म्हसळा पोलिसांनी गोधन चोरी व गोहत्येबाबत अनेक घटनांत गुन्हेगारांवर कारवाई केली आहे. गोधन चोरी करणे व गो हत्या करणे कायद्याने बंदी असताना अशा घटना सातत्याने घडत आहेत. अशा प्रकारचे गुन्हेगारांवर कारवाईचा कडक बडगा उचलून त्यांना कडक शासन झाले पाहिजे, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

## आंबेवाडी बाजारपेठेत जीवघेणे खड्डे



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेतील बँक ऑफ इंडियासमोर दीड ते दोन फूट मोठा खड्डा पडल्यामुळे यातून मार्ग काढताना वाहन चालकांसहित प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

या खड्ड्यामुळे आंबेवाडी बाजारपेठेत वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. या खड्ड्यातून प्रवास करताना दोन दिवसांपूर्वी मिनिडोअर पलटी होता होता थोडक्यात बचावला. या खड्ड्यामुळे मोठा अपघात घडण्याच्या आधी हा खड्डा सिमेंट कॉंक्रिटने भरून तात्पुरती उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला दिरंगाई होत असल्यामुळे महामार्गावरील तळवली, तिसे, वरसगांव, आंबेवाडी, गोवे, पुई, खांब, नागोठणे या गावांनजीक रस्त्याची अवस्था खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे अशी झाली आहे. यामुळे या महामार्गांवरील गाव, ग्रामस्थ हॉटेल, भाजी, किराणा, व्यावसायिक दुकानदारसह प्रवासी नागरिक हतबल झाले असून, दिवसेंदिवस मार्गावरून होत असलेली वाहतूक कोंडी त्रासदायक ठरत आहे.

## रस्त्यावर चिखल, खड्ड्यांचे साम्राज्य

### ● संतप्त नागरिकांचे चिखलात बसून आंदोलन

**। उरण । प्रतिनिधी ।**

अटल सेतू ते दिघोडे फाटा या कोकणात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने त्याचा नागरिक, पर्यटक, विद्यार्थी, रुग्णांना त्रास होत आहे. रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवावेत व लवकरात लवकर सदर रस्त्याचे रुंदीकरण करून कॉंक्रिटीकरण करावे, या मागणीसाठी दिघोडे गावातील संतप्त नागरिकांनी शुक्रवारी (दि. २५) चक्क दिघोडे फाट्यावरील चिखलात रुतलेल्या खड्ड्यांमध्ये बसून आंदोलन केले. या आंदोलनात सरपंच किर्तीनिधी ठाकूर, महिला, प्रवासी नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी जवळ जवळ दीड तास चिखलातील खड्ड्यात




बसून जनहितार्थ आंदोलन छेडल्याने रस्त्यावर मुंबई व कोकणाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची रांग लागली होती. आंदोलनाची दखल सार्वजनिक बांधकाम विभाग उरणचे उपअभियंता नरेश पवार, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दिघोडे गावचे सरपंच किर्तीनिधी ठाकूर यांना सदर रस्ता खड्डे मुक्त करण्यासाठी तसेच वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेतला जाईल, असे लेखी पत्र दिल्याने तूर्त आंदोलन स्थगित केल्याचे सरपंच किर्तीनिधी ठाकूर यांनी सांगून सदर आंदोलनात उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या दिघोडे गावातील ग्रामस्थ, प्रवासी नागरिक, महिलांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# साप्ताहिक राशिभविष्य २७ जुलै ते ०२ ऑगस्ट २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## विचारपूर्वक निर्णय घेणे फायद्याचे




**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता बरेच महत्त्वपूर्ण आणि कठीण निर्णय घ्यावे लागू शकतात, जे कदाचित आपल्या आजूबाजूच्या लोकांना चांगले दिसू शकत नाहीत, परंतु तरीही हे आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे पाऊल असल्याचे सिद्ध होईल. परोपकाराची भावना तुमच्यामध्येही जन्माला येईल आणि तुम्ही लोकांच्या मदतीसाठी पुढे जाऊ शकता. तथापि, या सर्व असूनही, आपण मानसिक असमाधानी राहाल आणि आपल्या मनात एक विचित्र अस्वस्थता असेल. कोणत्याही प्रकारची चिंताग्रस्तेत अडकू नका आणि आपले कौटुंबिक जीवन किंवा व्यावसायिक जीवन सर्वत्र विचारपूर्वक कार्य करीत असेल तरीही संयमाने कार्य करा. सप्ताहाच्या शेवटी आपल्यासाठी अनुकूल परिणाम मिळेल. जो तुम्हाला तुमच्या विरोधकांवर विजय मिळवून देतील. नंतरचा कालावधी मुलांसाठी आणि शिक्षणासाठी अडचणींनी भरलेला असू शकतो. **महिलांना-** आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारापासून तब्येत सांभाळा. **शुभदिनांक-** २७,२९.

## परदेश भ्रमणाचे योग




**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या लोकांना या कालावधीत मिश्रित फळ मिळेल. हा कालावधी आपल्यासाठी काहीसा आव्हानात्मकदेखील असू शकतो, परंतु आपल्या दृढ इच्छेमुळे आपण प्रत्येक समस्येचा सामना करण्यास सक्षम असाल. आपल्या ग्रहस्थितीमध्ये परदेश भ्रमणाची प्रबल शक्यता आहे. आनंदाची बाब म्हणजे अधिकांश प्रवासात तुम्हाला यश मिळेल. तीर्थयात्रा करण्यास चांगला योग आहे. पण, आपल्याला आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. कारण प्रतिकूल परिस्थितीत आपल्याला रुग्णालयात जावे लागू शकते. तुमचा खर्च वाढेल आणि तुम्ही काही चांगली कामे कराल. विशेष करून धर्म आणि सद्गुण कामात खर्च कराल. तुम्हाला अधिक पैशांचा नफा देखील मिळेल, परंतु खर्चही त्याच प्रमाणात वाढेल, **महिलांना-** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक-** २८,३०.

## आठवडा शुभफलदायी ठरेल



**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपणास यावेळी बऱ्याच चांगल्या भेटवस्तू मिळतील, ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न राहील. या राशीची ग्रहस्थिती या धारकाला नफ्याच्या मार्गावर घेऊन जाईल. परिणामी, हळूहळू आपल्या कौटुंबिक जीवनातील समस्या सुटतील. आपले धैर्य आणि पराक्रम वाढतील आणि आपण अनेक कठीण कार्ये सहजपणे करू शकाल. परंतु, आपल्याला प्रत्येक कामात आपले उत्कृष्ट योगदान द्यावे लागेल, तरच आपण अपेक्षित कृत्ये करण्यास सक्षम असाल. यावर्षी पैसे मिळवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करून सहल कमी कराल. आपण आवश्यकतेनुसार प्रवास कराल आणि विशेषतः आपल्या व्यवसाय किंवा कार्याच्या संबंधात प्रवास कराल आणि या सर्व सहल आपल्यासाठी फायदेशीर ठरतील. नोकरीत बदल करू शकता. **महिलांना-** ह्या महिन्यात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दहा दिवसांत पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक-** २९,३१.

## कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल




**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या कार्यक्षेत्रात झोकून देण्याचे ठरविल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. गरज नसलेल्या विचारांना थारा देऊ नका. नोकरदारांना दिलासा मिळेल. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. अनावश्यक खर्च टाळा. प्रकृतीची पथ्ये पाळा. गाठीभेटीचे योग संभवतात. घरासंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण आपल्या दैनंदिन व कौटुंबिक कारणांसाठी खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू सावरता येईल. प्रवासात सावधानता बाळगा. वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. स्थावरसंबंधीच्या कामांना चालना मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक-** ३०,०२.

## नोकरदारांना दिलासा मिळेल




**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत सावधानता बाळगल्यास अपेक्षित गोष्टी साध्य होऊ शकतील. कलाक्षेत्रातील व्यक्तींना उत्तम काळ असून त्याचा छान लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. व्यवसायात प्रगती करण्याची संधी मिळेल. विवाहेच्छुकांच्या मनोकामना पुऱ्या होण्याची संधी प्राप्त होऊ शकेल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आपली प्रतिमा मलीन होणार नाही याकडे लक्ष द्या. संभाषणात शब्दफेक योग्य करा. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणाबरोबरही स्पर्धा करण्याचे टाळल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. शेतीविषयक व कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. **महिलांना-** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. हाती घेतलेल्या कामांना सफलता मिळेल. येणाऱ्या प्रसंगांना शांततेने सामोरे जा. आपल्या कार्यात अधिक लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. **शुभदिनांक-** ३१,०१.

## जोडीदाराची साथ मिळेल



**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहमान पाहता आपण घेत असलेल्या परिश्रमांना सर्व बाबतीत सफलता मिळू शकते. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. विद्यार्थीवर्गाला त्यांच्या श्रमांना योग्य दाद मिळेल. अपयशाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास मागे वळून पाहण्याचे टाळू शकाल. परिश्रम ही यशाची गुरूकिल्ली आहे हे विसरू नका व त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना आपला जम बसविता येईल. सरकारी नियमांचे उल्लंघन होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वागल्यास हा सप्ताह लाभदायक राहू शकेल. स्थावर-जंगम मालमत्तेतील गुंतवणूक फायदेशीर ठरू शकेल. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगणे हितकारक ठरू शकते. **महिलांना-** आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची साथ मिळेल नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. **शुभदिनांक-** २७,२८.

## कामाची वरिष्ठांकडून प्रशंसा होईल




**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. ग्रहमान ठीक असले तरी आपण नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची संधी मिळेल. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. सरकारी नियमांचे पालन करा. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मुलांकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. राजकीय क्षेत्रातील मंडळींना हा काळ चांगला राहील. जोडीदाराशी मिळते-जुळते घेणे योग्य ठरेल.आपले एकूण ग्रहमान पाहता आपल्या कर्तृत्वाला बऱ्याच प्रमाणात वाव मिळेल व पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नव्या जबाबदाऱ्या येण्याची शक्यता राहील. प्रलोभनांपासून मात्र दूर राहणे योग्य राहील. **महिलांना-** विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक-** २९,३०.

## गुरुकृपेचा लाभ घेता येईल




**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात योग्य अशा खर्चाचा अंदाज अगोदर ठेवणे व त्यानुसार वागणे हितकारक ठरेल. आपल्या कामांना चांगला प्रतिसाद मिळेल. कुटुंबाकडे अधिक लक्ष द्या. जोडीदाराची साथ मिळेल. आपण एकूण ग्रहमान पाहता अनुकूल वातावरण असले तरी सर्व बाबतीत शांत विचाराने वागण्याचे ठरविल्यास अपेक्षित यश प्राप्त करता येईल. स्पर्धा-परीक्षेत आत्मविश्वासाने सामोरे जा व यशाची वाटचाल करण्यास तयार व्हा. कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. राजकीय व क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. आपणास यशस्वी व्हायचे आहे हे लक्षात ठेवून वागा. आर्थिक बाजू ठीक राहील. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. प्रकृती जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. एकूण ग्रहमान पाहता सर्व बाबतीत सामंजस्य ठेवल्यास हा आठवडा उत्तम जाऊ शकेल. **महिलांना-** आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल, **शुभदिनांक** - १,२.

## नवीन घर खरेदीची योग




**धनु :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता विचारपूर्वक नवीन कराराचा अवलंब करा. आपल्या अहंकारावर नियंत्रण ठेवणे आपले प्रथम प्राधान्य असले पाहिजे. कारण आपण यात अयशस्वी झाल्यास आपण बऱ्याच संधी गमावाल. काही कठोर निर्णय घ्यावे लागतील, परंतु हे आपल्याला आपले जीवनचक्र सुधारण्यास मदत करेल. हा कालावधी आपल्या आयुष्यातील एक चांगले आणि महत्त्वाचे पर्व असेल. आपण सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभागी व्हाल. आपण प्रयत्न केल्यास तर यावेळी आपले घर तयार करण्यास सक्षम असाल आणि आपल्याला एखादी मालमत्ता खरेदी करायची असेल तर त्यात यशदेखील मिळेल. तरीही तुमची शक्ती वाढलेली असेल, तुमच्या व्यवसायाला नवी दिशा मिळेल. ही दिशा तुम्हाला तुमच्या क्षेत्रात काम करण्यास प्रवृत्त करतील. आपला खर्च वाढेल आणि काही आरोग्यास त्रास होईल. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभदिनांक-** २७,२८.

## हाती घेतलेल्या कार्यात यश लाभेल



**मकर :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपला फिरण्याचा योग आहे. ज्यांनी विदेशात प्रवास करण्याची इच्छा मनामध्ये घेतली आहे, त्यांची इच्छा चालू काळात पूर्ण होण्याची शक्यता आहे. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता म्हणून तुम्हाला पैशासंबंधित व्यवहाराबद्दल विचार करणे चांगले होईल. आपल्याला सखोल गोष्टी जाणून घेण्यास स्वारस्य असेल आणि अध्यात्माशी संबंधित लोकांना खूप चांगले अनुभव येतील. धर्माशी संबंधित लोकांना वेगळ्या पद्धतीने धर्म उपदेश करण्याची संधी मिळू शकते आणि त्यांच्या शिष्यांची संख्या वाढेल. सप्ताहाच्या शेवटापर्यंत आपल्याला अन्न आणि आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. **महिलांना-** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक-** २९,३०

## नोकरीत पदोन्नतीची संधी



**कुंभ :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता सप्ताहाच्या मध्यभागी, आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही धार्मिक तीर्थयात्रा किंवा पर्यटनस्थळांच्या पर्यटनासाठी जाऊ शकता. या काळात आपल्या भावंडांना आरोग्याचा त्रास होऊ शकतो. अभिनय, नाटक, ललित कला, सर्जनशील कार्य, छायाचित्रण, समाजसेवा, माहिती तंत्रज्ञान, सिव्हिल अभियांत्रिकी, कायदा आणि समाजसेवा या सेवा प्रदाते इच्छुक किंवा काम करणाऱ्यांसाठी चांगले दिवस असण्याची शक्यता आहे. या कालावधीत केवळ आपल्या कामात प्रगती होईलच, परंतु या कार्यामुळे तुमचा सन्मानही वाढेल. राजकारणाच्या क्षेत्रातही काही लोकांना चांगले यश मिळू शकेल आणि सल्लागार म्हणून काम करणाऱ्यांना चांगले निकाल लागल्यास पदोन्नती मिळण्याची चांगली संधी मिळेल. यावर्षी मीन राशीच्या लोकांनी आपले प्रियजन, मित्र आणि सहकाऱ्यांसह नवीन बदलांसाठी तयार राहिला पाहिजे. **महिलांना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक** -३०,०२.

## भाग्योदयासाठी उत्तम कालावधी



**मीन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान बऱ्याचपैकी चांगले जाणार असून, ते आपल्या वैयक्तिक संबंधांना स्थायित्व आणि मजबुती देऊ शकतील. यावर्षी सहलींसाठी चांगली चिन्हे नाहीत, म्हणून कोणत्याही मोठ्या योजनांचा विचार करू नका. तथापि, नंतर परिस्थिती बदलेल आणि तुमच्या काही दूरवरच्या सहली होतील. येणाऱ्या दिवसांत पहिल्या काही दिवसांत प्रवाशांसाठी परिस्थिती फारशी चांगली नाही, परंतु मध्यभागी काहीसे चांगले दिवस असतील आणि पुढील काही दिवसात परदेश दौऱ्यासाठीही परिस्थिती योग्य असेल. यावेळी आपण बाहेरगावी जाण्यासाठी इच्छित असल्यास तर आपण आपल्या इच्छित ठिकाणी व्हिसादेखील मिळवू शकता. तुम्ही अशीही काही कामे कराल जी समाजाच्या हिताची असतील आणि तुम्ही परोपकारीही व्हाल. एखाद्यास अडचणीत पाहून आपण त्याला मदत करण्याचा प्रयत्न कराल आणि सुसंवाद आणि शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न कराल. **महिलांना-** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, अचानक आपले भाग्य उजळून निघणार आहे. एखादी लॉटरी घेण्यास हरकत नाही. **शुभ दिनांक-** २९,०१.

# विधिमंडळ अधिवेशन : जनतेच्या प्रश्नांना न्याय देणारे हवे!

**विधिमंडळाच्या अधिवेशनात १३३ तास ४ मिनिटे इतके कामकाज झाले. १५ विधेयक मंजूर झाले. ५ विधेयक मागे घेण्यात आले. ५११ लक्षवेधी स्विकृत झाल्या पण १५२ लक्षवेधींवर चर्चा झाली. जवळपास ४५ मिनिटे सभागृहाची कामकाजाविना वाया गेली. विधानपरिषदेत कामकाज १०५ तास झाले. प्रश्नोत्तराला मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचा वेळ वाया गेला.**



डॉ.विलास ज. पवार

राज्य विधिमंडळाचे अधिवेशन गेल्याच आठवड्यात म्हणजे १८ जुलै २०२५ ला संस्थगित झाले. यापुढचे अधिवेशन नागपूरला ८ डिसेंबरला असणार आहे. या विधिमंडळाच्या अधिवेशनात राज्यातल्या जनतेच्या प्रश्नांची सुटका करण्यासाठी असते. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाला विधिमंडळात वाचा फोडली जावी. सत्तारूढ सरकारला विरोधी पक्ष याबाबत जाब विचारतात. अधिवेशनातले कामकाज लोकशाहीच्या तत्वांची प्रत्यक्षात प्रकटीकरण आहे. या सभागृहात नवीन कायदे, योजना, अर्थसंकल्पीय सुधारणा, नियोजन शेतीविषयक, शेतीपूरक त्याचबरोबर कायदा सुव्यवस्था, राज्यातले आर्थिक, सामाजिक, सार्वजनिक इ. अनेक प्रश्नांची चर्चा, उपाय यांची सभागृहात मांडणी होत असते. यासाठी विरोधी पक्षांची भूमिका अतिशय महत्वाची असते; किंबहुना लोकशाहीच्या दृष्टीने विरोधी पक्षनेता या सार्वभौम सभागृहात लोकशाहीने दिलेल्या वैधानिक आयुधाद्वारे सत्तारूढ सरकारच्या योजना आणि नियम इत्यादींना प्रश्नाद्वारे टिका करणे, सरकारच्या कार्यपद्धतीत दोष असेल तर सभागृहाद्वारे त्याचे निराकरण करू शकतात. या विधिमंडळाच्या अधिवेशनात विरोधी पक्ष नेता निवडला गेला नव्हता. विधिमंडळाच्या अध्यक्षांना विरोधी पक्षनेता निवडण्यासाठी पुरेसा वेळच मिळाला नाही त्यामुळे विरोधी पक्ष नेता निवडीची प्रक्रिया करू शकले नाही आणि विरोधी पक्षनेता नसलेले हे अधिवेशन संस्थिगत झाले.

या विधिमंडळाच्या अधिवेशनात १३३ तास ४ मिनिटे इतके कामकाज झाले. १५ विधेयक मंजूर झाले. ५ विधेयक मागे घेण्यात आले. ५११ लक्षवेधी स्विकृत झाल्या पण १५२ लक्षवेधींवर चर्चा झाली. जवळपास ४५ मिनिटे सभागृहाची कामकाजाविना वाया गेली. विधानपरिषदेत कामकाज १०५ तास झाले. प्रश्नोत्तराला मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचा वेळ वाया गेलेला आहे.

विधिमंडळाच्या अधिवेशनात जनतेला जे अपेक्षित होताना दिसत नाही ही खरी खंत आहे. सरकार चालवणारे सत्तारूढ पक्ष हे अधिवेशन आपल्याला त्रासदायक होणार नाही. याकडे सुरूवातीपासून लक्ष देते तर विरोधी पक्ष जनतेच्या प्रश्नांना सभागृहात मांडायचे आहे त्यासाठी कशाप्रकारे राजकारण करता येईल याकडे लक्ष दिले जाते. अधिवेशनानंतर सुद्धा विरोधकांनी राज्यपालांकडे दाद मागितली आहे. विधिमंडळात बहुमताने सतत झालेला जनसुरक्षा विधेयक कायदा म्हणून अंमलात येण्यापूर्वीच तो रद्द करावा अशी मागणी विरोधक करीत आहेत. मुख्यमंत्र्यांनी हा कायद्यासंदर्भात अपप्रचार आहे असे विधिमंडळातच सांगितले होते. या कायद्याच्या संदर्भात निर्णय जो होईल तो होईल. परंतु या कायद्याच्या असा कोणत्या बाजू आहेत ज्यामुळे सर्वसामान्य जनतेचे भले होऊ शकेल. असे कोणते प्रश्न आहेत जे सोडवले जातील? कोणाच्या भल्यासाठी हा कायदा आहे? जनतेच्या प्रश्नांपैकी सत्तारूढ सत्तेचा माज दाखवताना दिसतात तर विरोधक जनतेसाठी हा गरजेची की नाही याबाबत चर्चा करायच्या ऐवजी राजकारण करताना दिसत आहे. सत्तारूढ आणि विरोधक एकाला झाकावं दुसऱ्याला काढावं अशा पद्धतीने वागताना दिसत आहेत. या विधिमंडळ अधिवेशनाचे फलित काय? हा संशोधन करण्याची गरजच नाही. जे आहे ते स्पष्टच आहे. पण या दरम्यान ज्या घटना घडल्या त्यामुळे जनतेचे प्रश्न दुय्यम आहेत बाकी सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत याचेच प्रत्यंतर आले आहे.



अधिवेशनात आ. संजय गायकवाड यांच्याकडून उपाहारगृहाची कर्मचारीला मारहाण झाली. आमदाराने केलेली मारहाण हे जनतेच्या प्रश्नासाठी नव्हतीच. पण त्यांच्यावर कारवाई करण्यास आग्रही असलेले विरोधक जनतेच्या अशा कोणत्या प्रश्नाला दाद मागत होते हा सुद्धा प्रश्न आहे. ही घटना घडली याबाबत गुन्हा घडलेला आहे तर त्याबाबत जी काही प्रक्रिया कायदेशीर आहे व ती करायलाच पाहिजे. विरोधकांनी सत्तारूढ सरकारचे वाभाडे काढायचे सोडून सभागृहात सत्तारूढ मुख्यमंत्र्यांना आमदार माजले असल्याची लोकभावना बोलून दाखवायला लागली होती. आ. जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये विधानभवनाच्या आवारातच फ्री स्टाईल पद्धतीने हाणामारी झाली. नितीन देशमुख, सर्जेराव टकले या आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली.

विधिमंडळाच्या आवारातच ही मारामारी झाली आहे ही खरीच गंभीर बाब आहेच याबाबत गुन्हा करणाऱ्यांना कडक शिक्षा अभिप्रेतच आहे. परंतु जे हे कार्यकर्ते आहेत त्यांचे विधिमंडळात काय काम आहे हा सुद्धा प्रश्नच आहे. विधिमंडळाचे कामकाज चालू असताना सर्वसामान्याला आपले प्रश्न घेऊन जाणे. विधिमंडळात प्रवेशाचा पास मिळणे जवळपास शक्यप्राय गोष्ट आहे. परंतु देशमुख आणि टकले या कार्यकर्त्यांवर अगोदर सात आठ गुन्हे दाखल आहेत. अशी गुन्हेगारी पार्श्वभूमी असताना विधिमंडळात प्रवेश देणारी यंत्रणा दोषी आहे याचा विचार करणे गरजेचे आहे. विधानपरिषदेत आ. शशिकांत शिंदे आणि आ. अनिल परब यांनी तर विधिमंडळात पैसे घेऊन प्रवेशपत्र दिले जातात. अशा प्रकारची टोळी कार्यरत आहे असेही आरोप केले आहेत. या आरोपाची सत्यता तपासण्यासाठी पुरावे देण्यास तयार असल्याचे सांगितले. हे आरोप प्रतिज्ञापत्राद्वारे देण्यास तयार असल्याचे सांगण्यात आले आहे. या सर्वांचा विचार भेटणार विधिमंडळाचे अधिवेशनाचे प्रयोजन धोक्यात येते आहे. याबाबत सर्वपक्षीय विचार होणे गरजेचे आहे. या अधिवेशनातच अजून एक बाब विरोधकांनी समोर आणली ती म्हणजे माजी गृहराज्यमंत्री श्री रामदास कदम यांची पत्नी, ज्योती कदम (आता विद्यमान गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची आई) यांच्या नावे कांदिवली येथील सावली बार ॲण्ड रेस्टॉरंट मध्ये डान्सबार सुरु होता असा आरोप आ. अनिल परब यांनी केला. राज्यात बंदी असताना राज्याच्या सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्याने आमदाराने अशा प्रकारच्या गुन्ह्याबाबत विरोधकांनी राजकारण करताना सर्वसामान्यांच्या अडचणींची चर्चा मांडायला हव्या आहेत. राजकारण करताना समाजकारणाची व्यवस्था पाहणे गरजेचे आहे. अजून एक प्रकरण विरोधकांनी की त्यांच्याच पक्षातून प्रसिद्ध केली गेली ती म्हणजे विधिमंडळात सभागृहात मोबाईलवर रमी खेळताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची चित्रफीत! ही चित्रफीत माणिकराव कोकाटे यांचा छंद स्पष्ट करतो की त्यांना अडकविणाऱ्यांचा उद्देश स्पष्ट होतो याबाबत सुद्धा गदारोळ होताना दिसतो आहे. त्यातच कृषीमंत्री शेतकरीच नव्हे तर शासन सुद्धा भिकारी असल्याचे नमूद करतात. अशा विधानाचा अर्थ कसा काय द्यायचा अशा प्रश्नच आहे. एकीकडे जेवू खावू घालणारा बळीराजा भिकारी, या सरकारचा मुख्यमंत्र्यांला भिकाऱ्यांचा म्होरक्या म्हणायचे कोकाटे सुचवितात की काय हे त्यांना विचारायला हवे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा तडफदार नेता हे सर्व कसे काय? आणि का बरे सहन करत असेल? साधनशूचिता, शिस्तबद्ध पक्षातून उभारलेले राज्याचे दोनदा नेतृत्व करणारे राज्याची जनता त्यांच्याबाबत आशावादी आहे. म्हणून बहुमताने निवडून दिले याचा त्यांना विसर पडलेला आहे का? विधिमंडळात जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक, पीक योजना शेतीमालाचा हमी जावा, उर्जा, सहकार, महसूल, शिक्षण इ. बाबत प्रश्नांबाबत तोडगा काढून जनतेचा विश्वास रास्त ठरवायला हवा आहे. येणारे प्रत्येक विधिमंडळाचे अधिवेशन हे जनतेसाठी आहे. राजकारण आणि विरोध काढण्यासाठी नाही. गुंडगिरीचे आखाडे भरविणारे, गुन्हेगारी भेद चालविणारे त्यामध्ये सहभागी नको आहेत हा मूल्याधारित विचार पुढे यायलाच हवा आहे.

**

# टाटा गाड्यांना नावे सुचवतात तेव्हा...

निलेश साठे

गण्या आमचा शाळेतला दोस्त. गण्या गण्याचे विनोद सांग की असं कोणी म्हटलं तर लगेच ह्यो म्हणणार सांगतु की मग. त्यात काय एवढं. मग गण्या विनोद सांगायला सुरुवात करणार. तो म्हणणार तुमाला सांगतो काका एकदा टाटा साहेब त्यांच्या बंगल्यामध्ये निवांत खुर्चीवर बसले होते. तेवढ्यात चार-पाच इंजिनीयर धावत धावत त्यांच्याकडे आले. आन सायबांना म्हणाले टाटा सायब टाटा सायब आमी गाड्या तर बनवू पण गाड्यांला नावं काय द्याची तेच आमाला कायबी कळना. तवा टाटा सायब म्हणलं नावंच सुचत नाय नव्ह. मी सांगतु लक्ष द्या.

असं म्हणून टाटा सायबांनी बाजूला काम करत असलेल्या नोकराला जवळ बोलावले. ए इकडं येरे. नावं काय तुझं.

हरी. राहायला कुठं आहस म्हटला तूं?

टाटा... टागोर नगर. हरियार

तु जीला पटवलंयस तिचं नाव तरी माहित आहे काय. हो इं दि. हम्म इंदि का?

बरं. दिसायला कशी आहे ती.

सुमो.. ती आयगो.....सुमो सारखी दिसते?



बरं. आणि काय देऊन पटवलंयस तिला.

गोल्ड.

सुमो..... गोल्ड?

तिनं तूला काय दिलं?

सफारी.

तेवढ्यात एक भली मोठी जाडी बाई बाजूला येऊन उभी राहिली. तिला पाहून टाटा ओरडले... इंदि.... गो.

असं म्हटल्यावर ती थुलथुलीत बाई तुरुतुरु चालत निघून गेली. मग टाटा म्हटले.

हिला पटवण्यासाठी तु किती वेळा इकडं आल्ता?

आल्तो... रोज, आल्तो.

द्यारे याला एक पंच

असं म्हणल्यावर त्या चार-पाच जणांनी त्याला मारायला सुरुवात केली. तसा तो ओरडू लागला.

टाटा बस

टाटा बस

आता मी त्या ट रा क वर नाही जाणार.

मग टाटा हॉर्न वाजवून प्लीज बोलतात तसेच सगळे बाजूला होतात.

समजलं का काही?

हम्म असं म्हणून सगळ्यांनी माना हलवल्या.

शी यारो

तुम्हाला समजलं. आता मला पेट्रोल भरायला लागेल ब्रिटिशांशी संगणमत करून. असं म्हणत टाटा टाटा करून निघून गेले.

ह्यो गण्या अशी काहीतरी शब्दांची जोड करतो तर गाववाले त्याला जोडे द्या अवॉर्ड देणार आहेत. त्याचा शोध चालू आहे कुठं गायब झालंय बेणं.

**

# धास्तावलेले नवरे

माधव गवाणकर


स्त्रियांमुळे पुरूषांच्या जीवनाला काही अर्थ प्राप्त होतो. घराला घरपण येते, स्थैर्य मिळते हे सत्य आहे. स्त्रीही पुरूषाची महत्वाची गरज आहे, हे भावनिक पातळीवर मान्य करावेच लागते. आईमुळेच बाळाला सुखरूप, सुरक्षित वाटते. बायको निघून गेली की, वैवाहिक जीवन कोलमडते.

मात्र, गेल्या काही वर्षात, विशेषतः स्मार्टफोनने इंटरनेटचे जाळे पसरल्यानंतर विवाहित स्त्रियांच्या वर्तनात नको ते बदल होत गेले. रोजच्या बातम्या तुम्ही वाचल्या किंवा स्क्रीनवर पाहिल्या. तरी जास्त काही सांगण्याची गरज ठरणार नाही.

उनाड किंवा गैरवर्तनी स्त्रिया काही फार नाहीत. सभ्य स्त्रिया त्यांची पाठराखण करीत नाहीत, पण अशा वैवाहिक एकनिष्ठेला न जुमानणाऱ्या ललनांच्या सत्यकथा, खरेतर गुन्हेकथा मीडियातून सतत येत राहिल्यामुळे तरूण पुरूषांमध्ये आता एक प्रकारची धास्ती आहे. काही नवरे मुलगे लग्नाआधी धास्तावलेले आहेत. काही नवरे लग्न करून पस्तावलेले आहेत. पुरूषांचा छुपा छळ आणि त्यांच्यावर होणारे अन्याय, खोट्या तक्रारी याविरोधात पुरूष मुक्तीची चळवळ आणि त्यांचे कार्यकर्ते काही प्रयत्न, धडपड करीत आहेतच. कायम अविवाहित राहणाऱ्या किंवा 'सिंगल' राहण्याची इच्छा असलेल्या पुरूषांपैकी एकाला, राहुलला मी सुचविले की 'नेट' च्या मदतीने पाठिंबा गट तयार करून त्याने 'मुक्त पुरूष' नावाची संघटना स्थापन करावी. विवाह न करण्याचा प्रवाह (ट्रेंड) हळूहळू वाढत जाणार आहे. 'मुक्त पुरूष' ने समाजभान ठेवावे. त्यात अनैतिक असे काही असू नये.

लग्न करून पस्तावलेले पुरूषही अनेक आहेत. त्यांना लग्नाच्या बेडीतून सुटका हवी असते. पण बायको सहजासहजी घटस्फोट देत नाही. भावाचा घटस्फोट झाला आणि त्यामुळे धाकट्या भावाचं लग्न जमेना अशीही एक 'केस' मी पाहिली.

मध्यंतरी, एका कॉलेजकुमाराशी सहज गप्पा मारताना तो चटकन म्हणाला. 'ती लग्नाची भानगडच नको!' हल्ली बायको नवऱ्याचा मर्डर करते, आणि त्यासाठी बॉयफ्रेंडची मदत घेते.' तो ज्याबद्दल बोलला, ती काही कॉमन गोष्ट नाही. पण अशा बातम्या अंगावर येत राहिल्यामुळे तरूणांमध्ये घबराट निर्माण होणे स्वाभाविक आहे! एकनिष्ठ नसलेल्या विवाहित स्त्रीचा पती कितीही पैसेवाला असला तरी या गोष्टीचा मोठा ताण त्याच्या मनावर असतो. खरेतर ताणतणाव, चुकीची जीवनशैली, जीवनातील यांत्रिकता, तोचतोचपणा, काम जीवनाबद्दलच्या चुकीच्या कल्पना व त्यांना खतपाणी घालणारे पॉर्न व्हिडिओज एकांताचा अभाव यामुळे नवरा मुलगा खचू शकतो.



भोंदूगिरीला बळी पडून नको त्या गोळ्या गिळू लागतो. वैवाहिक जीवनात खरोखरच अयशस्वी झाल्यास आत्महत्या करूनही मोकळा होतो! त्याच्या कुटुंबातील लोक मात्र चौकशीत अडकतात.

चिंताग्रस्त तरूणांमध्ये आणखी एक प्रकार दिसतो. 'माझं लग्न होईल की नाही?' अशा काळजीने तो पोखरला जातो. कारण, खेड्यात राहणारा नवरा मुलींना नको आहे. शेतकरी नवरामुलगा तर अजिबात नको आहे. एकूणच, सामाजिकदृष्ट्या हा विषय गंभीर आहे. प्रबोधन, समुपदेशन, प्रसंगी मानसोपचार, छोटी, कौटुंबिक बैठक घेऊन प्रश्नावर खुळेपणाने चर्चा करणे हे काही उपाय आपण सांगू शकतो. मात्र, मैत्रीतून जुळलेल्या प्रेमविवाहांच्या बाबतीत भरपूर समस्या दिसून येत आहेत. 'ती लग्नाआधी फार वेगळं वागायची आतासारखी त्रासलेली असते. लगेच चिडते.' अशी नुसती तक्रार न करता, बायको तसं का वागते याचा शोध व बोध करून घेणं महत्वाची ठरते.

ज्याला लग्नकर्तव्य आहे, त्याने नीट 'चौकशी' करून डोळसपणे विवाह करावा. शिवाय, त्याचे तिच्याशी जुळेल का? मते, वृत्ती स्वभाव यात फार भेद नाही ना? याची खातरजमा करून घ्यावी.

माध्यमांनी आता हे नवे प्रवाह आणि प्रश्न आता चर्चेसाठी घेतले पाहिजेत. पुरोगामी वृत्तपत्रे व मासिके तशा चर्चा घडवत आहेतच! प्रसिद्धीसाठी किंवा स्टंट म्हणून कुणीच काही करू नये. पण ज्याचे जळते त्याला कळते.

बायको 'मनोरूग्ण' असेल तर नवरा इतका त्रासून जातो, खोट्या संशयामुळे इतका गांगरतो की, त्याच्या आरोग्यावर परिणाम दिसू लागतात. तेव्हा शुभलग्न, सावधान!

**

# असंख्य तरुणांना रोजगाराचा आधार

## अलिबागसह अन्य जिल्ह्यात सोलर सिस्टीम बसविण्यामध्ये यश

सोलर सिस्टीम बसविण्यामध्ये पुरुषांची मक्तेदारी असते. परंतु ही मक्तेदारी अलिबागमधील एका महिलेने मोडीत काढत या व्यवसायात उभारी घेतली आहे. नऊपेक्षा अधिक तरुण, तरुणींना या व्यवसायातून रोजगाराचे दालन खुले करून दिले आहे. अलिबागसह अमरावती, नागपूर, येथील एक हजार पेक्षा अधिक ठिकाणी सोलर सिस्टीम बसविण्यात योगदान राहिले आहे. अलिबागची पहिली इलेक्ट्रीक महिला कॉन्ट्रॅक्टर म्हणून प्राची विवेक देवळे यांनी ओळख निर्माण केली आहे.

प्राची विवेक देवळे यांनी इलेक्ट्रीक इंजिनिअरचे शिक्षण पुर्ण केल्यावर मास्टर डिग्रीचे शिक्षण पुर्ण केले. अमरावती, चंद्रपुर येथील शिक्षण संस्थेत शिक्षण घेतल्यावर पुणे येथे नोकरी मिळाली. इलेक्ट्रीक कंपनीचे काम करण्यास मिळाले. या कंपनीच्या माध्यमातून तेलंगणा, हैदराबाद, आंध्रप्रदेश या ठिकाणी उच्च दाब वाहीने बसविण्याबाबतचे प्रोजेक्ट सादर करण्याची संधी मिळाली. सहा महिने या ठिकाणी त्यांनी काम केले. लग्न झाल्यानंतर त्या अलिबागला आल्या. आपल्या शिक्षणाचा उपयोग चांगल्या पध्दतीने व्हावा, यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. सुरुवातीला आरसीएफ कंपनीमध्ये इलेक्ट्रीक विभागात नोकरी मिळाली. ही नोकरी करीत असताना सोलर सिस्टीम बसविण्याचे काम फावळ्या वेळेत सुरू केले. त्यानंतर तारा पॉवरटेक सोलर इन्स्टॉलेशनचा व्यवसाय सुरु केला. २०२० मध्ये अलिबागमध्ये सोलर सिस्टीम बसविण्यात आली. अलिबागमध्ये आतापर्यंत ५००हून अधिक ठिकाणी सोलर सिस्टीम बसविण्यात आली असून चेंढरे, किहीम, नवगाव येथील शाळांसह अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय वॉटर टँक येथे सोलर सिस्टीम बसविण्यात आली आहे. अलिबागमधील सेंट मेरी स्कूलमध्ये पहिले सोलर सिस्टीम बसविण्यात आले. अलिबागसह चंद्रपुर, अमरावती, नागपूर येथील एक हजार शंभरहून अधिक ठिकाणी सोलर सिस्टीम बसविण्यात आली आहे. या व्यवसायातून नऊपेक्षा अधिक बेरोजगार तरुणांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामध्ये सहा तरुणींचा समावेश आहे. प्राची देवळे यांच्या मार्गदर्शनातून या तरुणी सोलर सिस्टीम बसविण्याचे काम करीत आहेत. या सोलर सिस्टीमुळे विज पुरवठा खंडीत होण्याबरोबरच वीज बील भरमसाठ येण्याचा प्रश्न कायमचा सुटला आहे. त्यामुळे एक हजारहून अधिक जणांना सोलर सिस्टीमचा आधार मिळाला असल्याचे चित्र आहे.

> **खडतर परिश्रमातून इलेक्ट्रीक इंजिनिअर ते पदवीचे शिक्षण घेतले. कुटूंबातील मंडळाकडून मिळालेल्या प्रोत्साहनातून भरारी घेतली आहे. सोलर सिस्टीम बसविण्याच्या व्यवसायातून नऊ पेक्षा अधिक बेरोजगार तरुणांना रोजगार देण्यात आले आहे. मोफत प्रशिक्षण देऊन गरीब मुला, मुलींसाठी रोजगार उभे करण्याचा प्रयत्न आहे.**
> **- प्राची देवळे, तारा सोलर इन्स्टॉलेशन**

**अनेक पदकांची ठरल्या मानकरी**

**प्राची देवळे यांनी सोलर सिस्टीम बसविण्याच्या व्यवसायतून उभारी घेतली असून त्यांनी हजारो लोकांना प्रशिक्षण दिले आहे. त्यांच्या कामाची दखल घेत त्यांना राज्यस्तरिय महाराष्ट्र गौरव पुरस्कार, कोकण उद्योगरत्न पुरस्कार, जागृती फाऊंडेशनच्या वतीने रिअल सुपर वूमन पुरस्कार, तसेच पहिली महिला विद्यूत मार्केटींग अभियंता म्हणून सत्कार असे अनेक पुरस्कार व सत्कार सोहळे झाले आहेत. ऑल इंडियास्तरावर झालेल्या सोलर सिस्टीम स्पर्धेत रायगडच्या मुलींनी उत्तम कामगिरी केली. दोन तासाच्या आत सोलर सिस्टीम बसवून देण्यामध्ये प्राची देवळे यांचा मोलाचे योगदान राहिले आहे.**

ग्रामीण भाहातील बऱ्याच मुला मुलींना विद्यूत संबंधित कामाचे मोफत प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आयटीआयचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सौर उर्जेबाबत प्रशिक्षण देऊन रोजगार देण्याचे काम त्या करीत आहेत. अलिबाग शहरात पहिली विद्यूत ठेकेदार म्हणून महावितरण तसेच खासगी विभागात कार्यरत आहे. चेंढरे, झिराडपाडा, चोंढी, पेणमधील ग्रामीण भागातील बऱ्याच गरीब मुला -मुलींना व्दियूत संबंधित कामाचे मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार देत आहेत. आयटीआय शिक्षित मुला, मुलींना सौर उर्जेबद्दल प्रसिक्षण देऊन त्यांच्यासाठी रोजगाराचे दालन खुले करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

जून २०२० मध्ये झालेल्या निसर्ग चक्री वादळात ग्रामीण भागातील तरुण, तरुणींना रोजगार देऊन विद्यूतची समस्या सोडवण्यात आली आहे. अलिबागमधील आरसीएफच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये सहाय्यक शिक्षिका म्हणून सेवा केली आहे. संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयाचे ज्ञान देण्याचे काम त्यांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाची रुची वाढावी, म्हणून यावर्षी गुढीपाडव्याला ग्रंथाची गुढी उभारण्यात आली होती. आजच्या युवा पिढीला खऱ्या अर्थाने ज्ञानाची गरज आहे. त्यांना योग्य शिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगाराची संधी देण्याचा प्रयत्न केला जात आहे.



# शुभमंगल सावधान!

नरेंद्र सोनार

'विवाह' हा संस्कार भारतीय परंपरेतील, प्रत्येकाच्या जीवनातील एक महत्त्वाचा संस्कार आहे. 'विवाह' हे प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे वळणच आहे. खरं तर 'विवाह' हा नववधूवरांच्या आयुष्यातील एक आठवणीतला दिवसच आहे.

आज या 'विवाह संस्काराचे' स्वरुप बदललेले पाहायला मिळते. आजचा 'विवाह सोहळा' पूर्वीप्रमाणे फक्त विधीसोहळा' राहिलेला दिसत नाही. आजचा विवाह म्हणजे थाटमाट, मोठी मेजवाणी, फोटोसेशन, प्रत्येकाचे स्वत:चे मिरवणे, स्वत:चे वैभव दाखवणे. हे स्वरुप आज सर्वच समाजात, सर्व समाजगटात पाहायला मिळते.

असा हा 'विवाह संस्कार' आपल्या कुटूंब संस्थेचा एक महत्त्वाचा संस्कार मात्र आज विवाह जुळतांना व जुळवतांना काही प्रश्न समोर येत आहेत. आज 'विवाह जुळवण्याचा' विषय कुटूंबासमोर आला की प्रत्येक समाजात थोड्याफार प्रमाणात लग्नासाठी मुली न मिळणे, मुलींची संख्या कमी असे विषय ऐकायला मिळतात. यामागे मुलींच्या व त्यामागे पालकांच्या अवास्तव अपेक्षा, स्वत:च्या स्टेट्सप्रमाणे मुलाचा शोध, विभक्त कुटुंबाला पसंती, सरकारी किंवा चांगल्या पगाराची नोकरी, मुलाचे स्वत:चे घर किंवा फ्लॅट, शेती, गाडी असणाऱ्याला पसंती, मुलगा शहरात राहणारा हवा. मुलगी आपल्याच शहरात देण्याचा आग्रह इ. यांतून विवाह लवकर जुळण्याला ब्रेक लागताना दिसत आहे.

या सर्वामागे आपली मुलगी सुखात रहावी ही भावना जरी चांगली असली तरी या अपेक्षा कधीकधी वास्तवाला धरुन दिसत नाहीत. आज शिक्षण आहे. पण स्पर्धा आहे. सरकारी नोकरी सर्वांनाच मिळणे कठीण आहे. याचाही विचार व्हायला हवा.

मुलींच्या आईवडिलांप्रमाणे मुलांच्या व त्यांच्या आईवडिलांच्या अपेक्षाही विवाह जुळतांना समोर येतात. मुलगी सुंदरच हवी. आपल्या स्टेट्सप्रमाणे हवी, आपल्या मुलाचा शिक्षणाचा खर्च लग्नातून भरुन निघावा, विवाहात मुलींकडून महागड्या भेटवस्तू. थाटामाटात लग्न लावून देणे ही अपेक्षा यातूनही अडचणी निर्माण होताना दिसत आहेत. ही परिस्थिती, या अपेक्षा मुलाकडच्या किंवा मुलीकडच्या शंभर टक्के सर्वत्रच असतील असे नाही.

या विषयाच्या बाबतीत समाजात मतमतांतरे आहेत. काहींच्या मते 'मुली न मिळण्याची' ही परिस्थिती गेल्या काही वर्षात वाढली आहे. मुलींचे प्रमाण कमी आहे, हे नक्की आहे. मुली आज शिकत आहेत. स्वत:चे करिअर स्वत:च्या पायावर बनवत आहेत. त्यासाठी पालकांचे स्वातंत्र्य आहे. शिक्षण, करिअर यासाठी त्या घराबाहेर पडत आहेत. घराबाहेरील वातावरणातून या मिळालेल्या स्वातंत्र्याचा काही प्रमाणात 'गैरअर्थ' घेत आहेत. यातून पालकांपेक्षा'स्व' पसंतीला 'स्व'निर्णयाला जास्त महत्व देत आहेत.

तर काही म्हणतात, 'मुलींच्या अपेक्षा या खऱ्या त्यांच्या नसून, आईवडिलांच्या आहेत.' मुलांच्या किंवा मुलींच्या आईवडिलांचे विचार हे परस्परांमधील 'अपेक्षा' बाबत जुळत नाही, त्यातूनही विवाह लवकर जुळत नाही.

यासर्वात असेही कुटुंब आहेत जिथे आज घरची आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असल्याने शिक्षण कमी असल्याने, वय वाढल्याने, मुलींच्या अपेक्षा वाढल्याने विवाह होत नाहीत. त्यांचे पालक या समस्येमुळे हतबल झाले आहेत. यातून सर्वच समाजातील अशा परिस्थितीतल कुटुंबे 'विवाह जुळवणाऱ्या फसव्या लोकांच्या मागे लागून आर्थिक नुकसान, सामाजिक हीनभावना, मानसिक ताणतणाव इ. ला सामोरे जात आहेत. तसेच या परिस्थितीचा फायदा 'फसवी विवाह मंडळे, 'टोळ्या' स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी सर्रास करुन घेतांना दिसते.

'खरं तर या लेखाचा विषय 'शुभमंगल सावधान' ठेवण्यामागे याच समस्येचा विचार समोर ठेवण्याचा आहे.

सामाजिक स्वास्थाच्या, धार्मिक दृष्टीने 'विवाह' हा संस्कार प्रत्येकाच्या आयुष्यात एक महत्वाचे वळण असते. पण यात एका बाजूला मुली न मिळणे, मुलींचे व मुलांचे लग्नाचे वय निघून जाणे, मुलांच्या व मुलींच्या घरच्यांचे विवाहकडे पाहण्याचा दृष्टीकोन मुलींच्या अवास्तव अपेक्षा. प्रत्यक्ष सत्य परिस्थितीचा स्वीकार न करणे, न समजणे, मुलामुलींचे घरातील लोकांच्या विरुद्ध न जाणे पण कालांतराने आपल्या मनाप्रमाणे प्रेमप्रकरणातून इतर कोणाशीही संसार करणे, या सर्व गुंतागुंतीच्या गोष्टी आज सर्वत्र थोड्याफार प्रमाणात दिसत आहेत.यासाठी समाजातील कुटूंबातील ज्येष्ठ-श्रेष्ठ लोकांचा पालकांचे प्रबोधन करण्यासाठी पुढाकार हवा. पालकांनी मुलांचे विश्व, त्यांचे प्रश्न समजून घ्यायला हवे. आज 'मुलीच्या' विवाहाच्या वेळी ठेवलेल्या अपेक्षा आपल्या मुलाच्या 'विवाहावेळी' इतरांनी केल्यावर कोणते प्रश्न, त्रास निर्माण करतात याचा विचार करायला हवा.

मुलामुलींनीही 'विवाह हा खेळ नाही' विवाह म्हणजे नवीन आयुष्याची सुरुवात, 'दोन भिन्न कुटूंबाचे एकत्रीकरण''योग्य वेळी विवाह म्हणजे पुढील वैवाहिक आयुष्याची योग्य सुरुवात हे समजून घ्यायला हवे.

विवाह जुळताना आज या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यातून मुलांचे व मुलींचे दोघांच्या जीवनाला वेगळे वळण, वेगळे संस्कार मिळत आहेत. या सर्वांतून सामाजिक परिस्थिती' बदलत चालली आहे.


ही परिस्थिती माझ्या या लेखाने लगेच सुधारेल असे नाही पण 'विवाह' जुळतांना आज 'समाजात काय चित्र आहे? हा विचार मात्र नक्कीच सर्वांसमोर जाईल.



## प्रेरक काव्यसंग्रह

# लेणे निसर्गाचे

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७




''लेणे निसर्गाचे'' हा दिलीप रामदास मोकल यांचा कविता संग्रह साहित्य संपदा प्रकाशनने देखण्यारूपात नुकताच प्रकाशित केला आहे. या कविता संग्रहाला ज्येष्ठ शिक्षक आणि साहित्यिक अनंत केशव देवघरकर यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. हाशिवरे गावातील महात्मा गांधी विद्यालयात देवघरकर शिक्षक होते. कवी दिलीप मोकल यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण त्यांच्याच मार्गदर्शनाखाली झाल्याचा उल्लेख त्यांनी सुरुवातीलाच केला आहे. ग्रामीण भागातील बेताच्या आर्थिक परिस्थितीतील शेतकरी कुटुंबातील दिलीप यांची, शिक्षणाच्या प्रगतीबरोबरच कविवृत्ती कशी विकसित होत गेली, याचा सोदाहरण परिचय या प्रस्तावनेतून वाचकाला होतो आहे. ''मनोगत''मध्ये कवीने आपली साहित्य क्षेत्रातील वाटचाल मांडली आहे. आईवडिलांचे संस्कार आणि शेती, उद्यानशास्त्राशी निगडित नोकरी यामुळे निसर्गाच्या विविध पैलूंचे कवीला दर्शन घडले. आपल्या काव्यसंग्रहामुळे निसर्ग, झाडे, वेली यावरील मनुष्याचे प्रेम वृद्धिंगत व्हावे अशी अपेक्षा दिलीप यांनी शेवटी व्यक्त केली आहे. या पुस्तकांमध्ये शिवाजी किसन खैरे आणि रमेश धनावडे यांनी पाठविलेल्या शुभेच्छा संदेशांचा समावेश करण्यात आला आहे. या कवितासंग्रहात एकूण ९३ कवितांचा समावेश करण्यात आला आहे. पुस्तकाचे रंगीत आणि सुंदर मुखपृष्ठ मनोमय मीडियाने साकारले आहे.

लेणे निसर्गाचे या कविता संग्रहातील विविध कविता निसर्ग कविता, पावसाच्या कविता आणि झाडांवरील कविता या तीन विभागांत समाविष्ट केल्या गेल्या आहेत. पहिल्या विभागात, विविध प्रकारच्या एकूण ३४ कविता आहेत. ''गाव माझे'' या कवितेत कवीने आपल्या हाशिवरे गावाची समग्र ओळख काव्यातून करून दिली आहे. शेवटी कवी लिहितो,

विविध धर्म, पंथ आणि जातीचे जन
गावात माझ्या नांदत असती आनंदाने
आठवडा बाजार भरतो येथे जत्रेसारखा
गरीबाची ही चूल पेटवतो गाव माझे(५)

अलिबाग नगरीचे वर्णनही नंतरच्या कवितेत येते. माझे जीवन, या हायकू रचनेत, निसर्गाच्या प्रभावामुळे कवीचे जीवन निसर्गाशी जुळल्याने, ''माझे जीवन सृष्टीचे झाले'' असे कवीला वाटते आहे! कोकणमेवा ही कविता दर्दी वाचकाच्या मनात, कोकणमेव्याची आठवण तीव्र करते. मातीचे ऋण, ऊर्जा, पर्यावरण, पानगळ, रात्र सागर तीरावरची, रंगपंचमी वृक्षराजीची, मन हे फुलपाखरू या कविता वाचकाला अंतर्मुख करतात. 'या झोपडीत माझ्या' या कवितेमुळे संत तुकडोजी महाराजांच्या मूळ कवितेची आठवण होते. झोपडीतही गरिबाला समाधान प्राप्त होते हे महत्त्वाचे. रानकवी या कवितेतून दिलीप यांनी नाधोंच्या निधनानंतरच्या आपल्या मनी दाटलेल्या भावना सार्थपणे व्यक्त केल्या आहेत. शेवटी दिलीप लिहितात,

**रान पान नभही अनाथ,**
**जाता महानोर ...(३७)**

''पावसाच्या कविता'' या विभागात एकूण २३ कविता समाविष्ट आहेत. तीव्र उन्हाळ्यानंतर पावसाच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर येणाऱ्या पावसाला, 'पावसा पावसा पड' असेच प्रत्येक जण कवीप्रमाणे म्हणत असतो. त्या वेळेचा ''मृदगंध'' ही नंतरच्या कवितेतून दरवळतो. भाऊबीज वरुण वसुधेची, या कवितेत कवी वरुणाच्या भाऊबीजेचे सुंदर वर्णन करतो आहे. नभाच्या डोळा, ही कविता वाचकाला अंतर्मुख करते. अती पावसामुळे होणारे नुकसान वाढत्या प्रदूषणामुळे म्हणजेच माणसाच्या अयोग्य वर्तनामुळे, ही जाणीव होते. आठवणीतला पाऊस-निसर्ग वादळ, या कवितेतून कवीने तीव्र वादळाच्या अनुभवलेल्या दुःखद आठवणी काव्यातून व्यक्त केल्या आहेत. पावसाच्या लहरीपणाचा बसणारा फटका काही कवितांतून समजतो, मात्र त्याला मानवही जबाबदार असल्याचे कवी सांगतो. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाऊस कसा हवा हे कवीने ''असा पडावा पाऊस'' या कवितेतून उत्तम प्रकारे मांडले आहे.

झाडांवरील कविता, या विभागात एकूण ३६ कविता आहेत. या विभागातील सुरुवातीच्या विविध कवितांतून वृक्षांचे महत्त्व स्पष्ट होत आहे. विविध प्रकारच्या वृक्षांच्या, त्यांच्या विविध वैशिष्ट्यांसह, त्यांची उत्तम ओळख नंतरच्या विविध कवितांतून करून दिली आहे. कल्पतरू नारळ कवितेत शेवटी कवी लिहितो,

**जमिनीतून रुजून तू**
**थेट गाठतोस आकाश**
**बहुउपयोगी असशी या जगी**
**तू एक कल्पवृक्ष..(७४)**

विविध फुलांवरील नंतरच्या कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

या काव्यसंग्रहातील बहुसंख्य कविता मुक्तछंदातील आहेत. काही कवितांमध्ये विशिष्ट वृत्ते वापरली आहेत. कवीच्या ग्रामीण भागातील वास्तव्यामुळे आणि नंतर त्यासंबंधीच्या व्यवसायामुळे, या कवितांमध्ये मानवाला सुधारण्याचा अंतर्भूत सल०लाही जाणवतो आहे. या काव्यसंग्रहाची छपाई, सादरीकरण उत्तम आहे. मात्र काही ठळक मुद्रणदोष खटकतात. मलपृष्ठावर कवी दिलीप रामदास मोकल यांचा, त्यांच्या रंगीत छायाचित्रासह सविस्तर परिचय करून दिला आहे. **

**पुस्तकाचे नाव : लेणे निसर्गाचे (कवितासंग्रह)**
**कवी : दिलीप रामदास मोकल ९१६८१४६७१८**
**प्रकाशक : साहित्यसंपदा प्रकाशन, पेण**
**प्रथम आवृत्ती : १ मे २०२५**
**पृष्ठे :१०१ स्वागतमूल्य : रु. २००/-**

# निसर्गरम्य श्रावण आणि नागपंचमी...!!'

धनंजय शेटये

अगदी बालपणीचा श्रावण म्हणजे अतिशय आनंददायी असायचा.प्राथमिक शाळेत असताना दर श्रावण सोमवारी शाळा अर्धा दिवस असायची. दुपारी मग आम्ही मुलं गावच्या रवळनाथ मंदिरात जात असायचो. दुपारी मंदिरात भाविकांची गर्दी असायची. भजन गायन असायचं. दुपारच्या शांत वेळी भजन गायनाचे मधुर स्वर मंदिर परिसरात नारळापोफळीच्या बागात घुमत असायच्या. लोकांच्या अंगात 'वारी' यायची. गावातील बऱ्याच लोकांच्या अंगात 'वारं' उभं राहायचं. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यापलिकडे मन संस्कृतीत खोलवर रुजलेले असल्याने गावच्या या परंपरा, रितीरिवाज आनंद देणाऱ्या होत्या. आजही त्या परंपरा लोकांना आत्मिक समाधान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असतात. आध्यात्मिक संस्कृतीचं जतन करणं गरजेचं आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यापलिकडे जाऊन एक आत्मिक समाधानाची कला संस्कृती म्हणून अशा गोष्टींकडे पाहिले तर निखळ आनंद मिळतो.

गावचा नियम होता श्रावण सोमवारी अर्धा दिवसच शेतात काम करायचे.नंतर धार्मिक स्थळी देवदर्शनाला उपस्थित राहायचं. घरातली सगळी मोठी माणसं मंदिर परिसरात दाखल व्हायची. मुलं सुद्धा त्यांच्यासोबत असायची. रवळनाथ मंदिर परिसर भक्तीरसात न्हाऊन निघायचा. निसर्गातही पानाफुलांना बहर आलेला असायचा. श्रावण महिन्यात गणपतीच्या शाळा मंदिराजवळच्या वाडीत असल्याने शाडू मातीच्या मुर्ती घडविणाऱ्या गणपतीच्या शाळेत आम्ही मुलं तासनतास रेंगाळत असायचो.बाप्पाच्या मुर्त्या बघून मन तृप्त व्हायचे. त्याच गणपतीच्या वाळेतून

नागोबाच्या सुंदर मुर्ती नागपंचमीला घरी घेऊन जाताना एक वेगळाच आनंद दरवळायला.

आज हे सगळं आठवलं की या शहरी जीवनाचा उबग येऊन लागतो.

श्रावणाचं नाव घेताच मन एकदम कोकणात जाऊन पोहोचतं. पावसाच्या पहिल्या सरींसोबतच कोकणात जणू निसर्गाने जादू केली असावी! डोंगरांची शिखरं धुक्याच्या घुंगटात लपलेली नारळ-फणसाच्या झाडांनी डौलात उभं राहिलेलं गाव, आणि लाल मातीच्या पायवाटा हे सगळं श्रावणात जिवंत होतं.

निसर्गात नटलेली वनराई, हिरव्यागार गालिच्यासारख्या अफाट माळरानावरील गवतात उगवणारी असंख्य गवत फुले मन वेधून घ्यायची. शेतात पाहावे तर गर्भार अवस्थेत उभी असलेली गडद हिरवीगार भाताची शेते इंद्रधनुष्यांच्या सप्तरंगात न्हाऊन निघायची. कोवळी सुर्यकीरणे या भातशेतीवर पडली की निसर्गरम्य देखावे विलोभनीय वाटायचे. ओढे-नाले,नद्या तुडुंब भरून वाहत असायच्या खळाळणा-या पाण्याचा आवाज आणि ते काचेसारखे स्वच्छ पाणी मन वेधून घ्यायचे.भारतीय संस्कृतीमध्ये श्रावण महिना अत्यंत पवित्र आणि सात्त्विक मानला जातो. विविध व्रते, उपवास, पूजाअर्चा, आणि शुद्ध आचरण यामध्ये या महिन्याचे विशेष महत्त्व आहे. या काळात अनेकजण मांसाहार, मद्यपान, कांदा-लसूणसारखे पदार्थही टाळतात. विशेषतः मांसाहार टाळण्याची परंपरा अनेक पिढ्यांपासून चालत आली आहे.

पण यामागे केवळ श्रद्धा नसून धार्मिक, शास्त्रीय, पर्यावरणीय आणि वैद्यकीय अशा अनेक अंगांनी समृद्ध कारणं आहेत.श्रावण महिना हा भगवान शंकराला अर्पण केलेला महिना आहे. या महिन्यात सावध, संयमी आणि सात्त्विक जीवनशैली पाळावी, असा शास्त्रांचा आग्रह आहे.



अनेक शिवभक्त उपवास, अभिषेक, रुद्रपठण, शिवलिंगाची पूजा करतात. त्या वातावरणात मांसाहार हे तामसिक असल्यामुळे त्याचा त्याग करणं उचित मानलं जातं.

श्रावणात येणारे महादेव, नागपंचमी, गोपाळकाला, रक्षा बंधन, नारळी पौर्णिमा यांसारखे सणही संयमाची शिकवण देतात.

पावसाळ्यात शरीराची पचनशक्ती कमकुवत होते. मांसाहार हा उष्ण, पचायला जड आणि तामसिक असतो.

या ऋतूमध्ये पचनसंस्थेवर ताण येतो. त्यामुळे गॅस, अपचन, आम्लपित्त, त्वचारोग, अतिसार यांसारखे विकार होऊ शकतात.

मांसाहारामुळे शरीरात विषारी पदार्थ, उष्णता आणि जडता वाढते, जे श्रावणात अयोग्य ठरते.

आयुर्वेद सांगतो की, या काळात लघुपच्य व सात्त्विक अन्न, उदा. मूग, तांदूळ, दूध, फळं, भाज्या यांचे सेवन हितकर ठरते.

पावसाळ्यात प्राणी व पक्षी यांचा प्रजनन काल चालू असतो. मासे, बेडूक, कासव इ. जलचर अंडी घालतात.

मांसाहाराचा आग्रह केल्यास ही जैवविविधता धोक्यात येते.

पाण्यात विषाणू आणि जंतू वाढतात, त्यामुळे मासे व इतर जलजीव दूषित असण्याची शक्यता वाढते.

सततचा शिकार आणि खाण्याची वृत्ती निसर्ग चक्राच्या विरोधात जाते. श्रावण म्हणजे निसर्गसंवर्धनासाठी संयमाचे प्रतिक.

मांसाहार हा तामसिक (आळशी, क्रूर, रागीट) गुण वाढवतो. यामुळे ध्यान, जप, पूजा यास अडथळा निर्माण होतो.

श्रावणात सात्त्विकता वाढवण्यासाठी आणि मनः शांती व संयम वाढवण्यासाठी ताजं, शाकाहारी, हलकं अन्न योग्य ठरतं.

'जसे अन्न, तसे मन'हे आयुर्वेदीय तत्त्व इथे लागू पडते.पूर्वी घरांमध्ये सण-उत्सवांमध्ये नियम, उपवास, पर्व, संकल्प असत. त्यामुळे समाजात सामूहिक सात्त्विकता जपली जायची.

या महिन्यातील संयमाचे संस्कार लहानपणीच रुजवले जात.

विविध व्रतांमुळे आत्मशिस्त, संयम, भक्ती आणि शुद्ध विचारांचा विकास होतो.

आजही श्रावणात काही काळ मांसाहार टाळल्यास शरीराला आहारसंतुलित करता येते. पर्यावरण संकट, वन्यजीव संरक्षण आणि आरोग्यविषयक चिंतेच्या पार्श्वभूमीवर ही परंपरा वैज्ञानिकदृष्ट्या योग्य व वेळेस सुसंगत ठरते.

यामुळे नैतिकता, संवेदनशीलता आणि जगण्याच्या चांगल्या सवयींची जाणीव निर्माण होते.श्रावणात मांसाहार टाळणं म्हणजे अंधश्रद्धा नव्हे. ती एक प्राचीन जीवनशैली आहे जी आजही पर्यावरण, आरोग्य आणि अध्यात्म यासाठी योग्य व आवश्यक आहे. ही परंपरा म्हणजे नैतिक जाणीव, निसर्गपूरक आहार आणि शुद्ध मनोभूमिकेचा योग आहे.

श्रावण हे संयम, श्रद्धा आणि शुद्धतेचे प्रतीक असून, मांसाहार टाळणं म्हणजे त्या सात्त्विकतेला आदर देणं होय.

भारतीय संस्कृतीत निसर्गाशी जोडलेले असंख्य सण आहेत. या सणांचा उद्देश केवळ धार्मिक विधी पार पाडणे नसून, त्यामागे एक गूढ पौराणिक, वैज्ञानिक आणि सामाजिक संदेश असतो. नागपंचमी हाही एक असा सण आहे, जो सर्प या प्राण्याच्या पूजनाशी संबंधित असूनही, त्यामागे खोल संस्कृतिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणीय अर्थ दडलेला आहे.

नागपंचमी हा सण श्रावण महिन्याच्या शुद्ध पंचमीला, म्हणजेच श्रावण शुद्ध पंचमी या तिथीला साजरा केला जातो. याला सर्पपूजनाचा दिवस म्हणून ओळखले जाते. या दिवशी विशेषतः नागदेवतांची पूजा केली जाते. ग्रामीण भागांमध्ये हा सण अत्यंत श्रद्धेने साजरा केला जातो.

जनमेजय व आस्तिक मुनीची कथा (महाभारत)

राजा परीक्षिताला तक्षक नावाच्या नागाने दंश केला होता. त्याचा पुत्र राजा जनमेजय याने सर्पवंशाचा संपूर्ण नाश करण्यासाठी भयंकर सर्पयज्ञ आरंभ केला. या यज्ञात असंख्य नाग होमात जळून गेले. यावेळी आस्तिक मुनी ऋषी जेरत्कारू व नागकन्या मनसा देवी यांचा पुत्र यांनी केलेली विनंती ऐकून राजा जनमेजयाने यज्ञ थांबवला. ही पंचमीचीच तिथी असल्यामुळे त्या दिवसापासून नागपंचमी साजरी केली जाते.

भगवान शिवाच्या गळ्यातील नाग म्हणजे वासुकी. नाग हे शिवाचे अलंकार मानले जातात. म्हणूनच या दिवशी नागांची पूजा म्हणजे प्रत्यक्ष शंकराचीच आराधना मानली जाते.

समुद्रमंथनाच्या वेळी वासुकी नागराज याने मंथनदोरीचा कार्यभाग पार पाडला होता. त्यामुळे त्याच्या साहाय्यामुळे अमृत मिळाले आणि सृष्टीच्या कल्याणाचे कार्य झाले.

नागदेवतांची प्रतिमा भिंतीवर कोरली जाते किंवा सड्यावर चित्र रेखाटले जाते.

सर्पमूर्तीला किंवा प्रतिमेला दूध, कुंकू, फुले, हळद, दूर्वा, लसून न घातलेला नैवेद्य अर्पण केला जातो.

अनेक ठिकाणी प्रत्यक्ष सापाच्या बिळांजवळ जाऊन पूजा केली जाते.या दिवशी जमीन खोदणे निषिद्ध मानले जाते, कारण नाग जमिनीत राहतात.नागदेवता रागावल्या तर सापदंश होतो अशी श्रद्धा असल्याने, त्यांचे शांततेने पूजन केले जाते.घरातील स्त्रिया आणि मुली खास करून उपवास करतात आणि भावंडांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करतात.

काही भागात, स्त्रिया दुपारी सर्पाचे पारंपरिक चित्र (कोरडे, हळद, कुंकवाने) रेखाटून ओवाळणी करतात.

पावसाळ्यात साप जमिनीतून बाहेर पडतात. त्यावेळी त्यांच्याशी माणसाचा संघर्ष वाढतो. नागपंचमीच्या निमित्ताने सापांबाबत आदरभावना जागृत होते.

सर्प परिसंस्थेतील एक महत्त्वाचा घटक आहे. ते उंदरासारख्या कीटकांचे प्रमाण नियंत्रित करतात, जे शेतीसाठी हितकारक असते.

नागांची पूजा म्हणजे निसर्गसंतुलन राखण्याची एक जैविक श्रद्धा!मल्हार, ओव्या, लोकगीते नागपंचमीच्या निमित्ताने गायली जातात.या दिवशी स्त्रिया पारंपरिक हरतालिका, ओव्या गातात आणि नागदेवतेला आरती म्हणतात.काही ठिकाणी रेशीमगाठी, राख्या बांधण्याची प्रथा सुद्धा या पंचमीला पाहायला मिळते.नागपंचमी केवळ सापांची पूजा नाही, तर ही एक निसर्गपूजक संस्कृतीची साक्ष आहे. या सणाच्या माध्यमातून माणूस सृष्टीतील इतर जीवांप्रती आपुलकी ठेवायला शिकतो. पौराणिक कथांमधून आपल्याला जीवनमूल्ये, समतेची भावना आणि पर्यावरणाच्या संरक्षणाचा संदेश मिळतो. आजच्या यांत्रिक युगात अशा सणांच्या सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टीकोनातून नव्याने अर्थ लावायला हवा. नागपंचमी म्हणजे निसर्गाशी सलोखा, सजीव सृष्टीशी स्नेह आणि पर्यावरण रक्षणाची प्रतिज्ञा! **

# भारताच्या आशा मावळल्या

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

ओल्ड ट्रॅफर्ड कसोटीत विजय मिळवून मालिकेत बरोबरी साधायच्या भारताच्या आशा सामन्याच्या तिसऱ्या दिवशीच मावळल्या आहेत. आता भारताचे उद्दिष्ट असेल ते सामना वाचवून मालिकेतील पराभव टाळायचे. १८६ धावांच्या पिछाडीवरून आघाडी घेऊन सामना जिंकायचे भगीरथ प्रयत्न क्वचितच साधले जातात. इंग्लंडच्या गोलंदाजांना पहिल्या दिवशी ढगाळ हवा, खेळपट्टीतील दमटपणाचा फायदा मिळाला हे सर्व मान्य आहे; पण भारतीय गोलंदाजांनी बळी मिळत नसताना धावा रोखायचे प्रयत्न केल्याचे अथवा खेळाची गती कमी करायचे कुठचेही प्रयत्न केले नाहीत.

सिराजच्या वर्कलोड मॅनेजमेंटचा कुणी विचार करत नसले, तरी चौथ्या सामन्यात अथक प्रयत्न करून त्याची दमछाक झाली आहे. बुमराहच्या पायाला दुखापत झाल्याची बातमी आल्यानंतर त्याच्या गोलंदाजीवर



■ सामना वाचवून पराभव टाळायचे उद्दिष्ट

■ १८६ धावांची पिछाडी

काय परिणाम होतो, हे बघावे लागेल. अँडरसन एंडकडून चेंडू थोडा खाली बसत असल्याने थोडीफार आपल्या गोलंदाजांना मदत मिळाली; पण तरी ही खेळपट्टी अजूनही फलंदाजीचे नंदनवन आहे. ओल्ड ट्रॅफर्डला तीन फिरकीपटू घ्यायचे का, चार जलदगती गोलंदाज घ्यायचे या सामन्यापूर्वीच्या संघ निवडीच्या प्रश्नाचे उत्तर भारताला दुसऱ्या दिवशी उपहारानंतरच्या जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरच्या स्पेलने दिले. भारताने दुसरा नवा चेंडू घ्यायचे थोडी षटके टाळून सुंदर आणि जडेजाची गोलंदाजी चालू ठेवली. उपहारापर्यंत इंग्लंडने एकही गडी न गमावल्याने सामना भारतापासून दूर चाललेला असताना या दोन फिरकीपटूंनी इंग्लंडच्या धावांवर ब्रेक लावला आणि वॉशिंग्टन सुंदरने पोप आणि ब्रूकला लागोपाठ बाद करून भारताला सामन्यात टिकून राहण्याची अंधुकशी आशा दाखवली होती; पण रूट आणि स्टोक्सने त्याच्यावर पाणी फेरले.आपल्या जलदगती गोलंदाजांना यश मिळत नसताना वॉशिंग्टन सुंदरची आठवण गिलला इंग्लंडच्या डावाची ६८ षटके झाल्यावर झाली. इंग्लंडने तोपर्यंत धावांची सरासरी ४.४८ राखली होती. जडेजा आणि सुंदरने पुढची २२ षटके टाकत ती सरासरी सव्वाचारपेक्षा कमी आणली आणि मुख्य म्हणजे दोन बळी मिळवले.

### बुमराहकडून निराशा

**बुमराहकडून नेहमीप्रमाणे आशा होत्या; पण त्याने उत्तम गोलंदाजी केली, तरी त्याने बळी घेण्याचा आपला नेहमीचा वाटा उचलला नाही आणि पर्यायाने भारताच्या गोलंदाजीचा दबदबा दिसला नाही. अर्थात एकटा बुमराह तरी किती दिवस पुरणार? प्रत्येक सामन्यात त्याने पाच बळी मिळवायची आशा आपण ठेऊ शकत नाही.**

जो रूट महान फलंदाज होताच पण बॅझबॉल खेळातसुद्धा धावांचा रतीब घालत तो आजही जागतिक क्रिकेटमध्ये उभा आहे. आपले शतक पूर्ण करत एकाच सामन्यात द्रविड, कॅलिस आणि पाँटिंगच्या धावांचा विक्रम मोडत तो सचिन तेंडुलकरला आव्हान द्यायला दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. संघाचा आधारस्तंभ कसा असावा, तर जो रूटसारखा, घरातल्या कर्त्या पुरुषासारखे त्याचे संघातील स्थान आहे आणि इंग्लंडची फलंदाजी त्याच्या भोवती गुंफली आहे. जो रूटने आपल्या १५७ व्या सामन्यात या १३,४०९ धावा काढल्या आहेत. तेंडुलकरपासून तो फक्त २,५१८ धावा दूर आहे. भारताच्या दुसऱ्या क्रमांकाच्या धावांचा विचार केला, तर तो थेट तेंडुलकरपेक्षा सहा हजारांनी कमी विराट कोहलीचा (९२३०) आहे.

थोडक्यात सांगायचे तर तेंडुलकर, कोहली आणि रूटसारखे चौथ्या क्रमांकाचे खेळाडू संघाचे तारणहार असतात. शुभमन गिलने आपणहून चौथा क्रमांक घेतला आहे. पहिल्या दोन कसोटींत त्याने सुरेख फलंदाजी केली; पण ही कसोटी वाचवायची असेल, तर या दिग्गजांसारखे त्याने चौथ्या क्रमांकाला साजेशी फलंदाजी दुसर्या डावात करणे गरजेची आहे. कर्णधार गिलने मालिकेच्या आधी म्हटले होते, कितीही धावा केल्या तरी सामना जिंकायला वीस बळी घ्यावे लागतात. आपल्या गोलंदाजांची कामगिरी बघता त्यांनी वीस बळी घेणे हे दुरापास्त वाटते. इंग्लंडचा पहिलाच डाव अजून आपल्याला आटोपला नाही, तेव्हा इंग्लंडची या पुढची प्रत्येक धाव आपल्या आशा अजूनच मावळ–णारी ठरणार आहे.

## वेदाचा क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय महिला आणि पुरूष संघ इंग्लंड दौऱ्यावर आहे. भारताच्या रणरागिणींनी इंग्लंडच्या त्यांच्याच भूमीत लोळवत इतिहास रचला आहे. अशातच ३२ वर्षीय स्टार खेळाडू वेदा कृष्णमूर्तीने क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय जाहीर केला आहे. वयाच्या १८ व्या वर्षी पदार्पण केलेल्या वेदाने क्रिकेटला अलविदा केले आहे. वनडेमध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावणारी ती दुसरी भारतीय महिला खेळाडू आहे. वेदाने पाच



वर्षांपूर्वी २०२० च्या टी–२० वर्ल्ड कपमध्ये आपला शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. पाच वर्षांनंतर तिने अचानक निवृत्तीची घोषणा केल्याने क्रिकेट वर्तुळात चर्चा होताना दिसत आहे.

### वेदाची कारकीर्द

**वेदा कृष्णमूर्तीने भारतासाठी आपल्या कारकिर्दीत ४८ एकदिवसीय आणि ७६ टी–२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. तर एकदिवसीय सामन्यात तिने ८२० आणि टी–२० मध्ये ८७५ धावा आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये तिने आठ अर्धशतके झळकावली. २०१७ च्या महिला विश्वचषकात त्यांनी न्यूझीलंडविरुद्ध ४५ चेंडूत ७० धावांची तुफानी खेळी केली होती. तिच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम खेळींपैकी एक होती.**


## सात्विक-चिरागची विजयाने सुरुवात

**दिल्ली :** चांगझोऊ येथे खेळल्या गेलेल्या चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी–चिराग शेट्टी जोडी रेड्डी आणि शेट्टी यांच्या जोडीने जपानच्या हिरोकी ओकामुरा आणि केनिया मित्सुहाशी यांच्या जोडीला २१–१३–२१–९ असा सरळ गेममध्ये पराभूत केले. चांगझोऊ येथे खेळल्या गेलेल्या चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी–चिराग शेट्टी जोडी यांनी विजयाने सुरुवात केली आहे.

## मेस्सी-अल्बावर एका सामन्याची बंदी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंटर मियामीचे स्टार खेळाडू लिओनेल मेस्सी आणि जॉर्डी अल्बा यांना मेजर लीग सॉकर (एमएलएस) ने प्रत्येकी एका सामन्यासाठी बंदी घातली आहे. दोन्ही खेळाडू या वर्षीच्या एमएलएस ऑल–स्टार गेममध्ये सहभागी नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. यामुळे, लिओनेल मेस्सी जॉर्डी अल्बा निलंबन अपडेट दोन्ही खेळाडू या वर्षीच्या एमएलएस ऑल–स्टार गेममध्ये सहभागी न झाल्यामुळे हा निर्णय



घेण्यात आला. यामुळे, दोन्ही खेळाडू इंटर मियामीच्या एफसी सिनसिनाटी विरुद्धच्या पुढील लीग सामन्यात खेळू शकणार नाहीत. इंटर मियामीचे मालक जॉर्ज मास यांनी हा निर्णय कठोर आणि अन्याय्य असल्याचे म्हटले आहे.

## यू इन स्पोर्ट्स बुद्धिबळ स्पर्धा
## ३४ खेळाडूंची संयुक्त आघाडी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

यू इन स्पोर्ट्सच्या चौथ्या आंतरराष्ट्रीय फिडे १७०० पेक्षा कमी मानांकन बुद्धिबळ स्पर्धेत तिसऱ्या फेरीअखेर प्रसाद खेडकर, केविन मथीयझागान, कश्यप खाखरिया, ईशान कदम, भूमिका वागले, अपर्णा गुप्ता, मुक्तानंद पेंडसेंसह एकूण ३४ खेळाडू तीन गुण मिळवून संयुक्तरित्या आघाडीवर आहेत.

अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना, पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कलच्या मान्यतेने आळंदी येथील एम. आय. टी. अकादमी ऑफ इंजिनिअरिंग येथे शुक्रवारपासून सुरू झालेल्या या



स्पर्धेचे उदघाटन महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेचे सचिव निरंजन गोडबोले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सहसचिव राजेंद्र कोंडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून बुद्धिबळ क्रीडा ट्रस्टचे प्रकाश कुंटे होते. यावेळी मुख्य पंच प्रवीण ठाकरे, नागनाथ हलकुडे हे उपस्थित होते. प्रास्ताविक योगेश रवंदळे यांनी केले तर आभार प्रा. श्रीधर खांडेकर यांनी मानले. या स्पर्धेत एकूण ४०२ खेळाडूंनी भाग घेतला आहे.

### तिसऱ्या फेरीचे काही निकाल

**सौभाग्यसिंग (२ गुण, उत्तर प्रदेश) पराभूत विरुद्ध प्रसाद खेडकर (३ गुण, महाराष्ट्र), द्रिश्य नाईक (२.५ गुण, महाराष्ट्र) बरोबरी विरुद्ध सार्थक शिंदे (२.५ गुण, महाराष्ट्र), केविन मथीयझागान (३ गुण, महाराष्ट्र) वि.वि. इम्रान हुसेन (२ गुण, रेल्वे), जितेंद्र वाळिंबे (२ गुण, महाराष्ट्र) पराभूत विरुद्ध कश्यप खाखरिया (३ गुण, महाराष्ट्र), ईशान कदम (३ गुण, महाराष्ट्र) वि.वि. रुतम मोहगावकर (२ गुण, महाराष्ट्र), स्वराज काळे (२ गुण, महाराष्ट्र) पराभूत विरुद्ध भूमिका वागले (३ गुण, महाराष्ट्र), रोनित मोटवानी (२ गुण, महाराष्ट्र) पराभूत विरुद्ध अपर्णा गुप्ता (३ गुण, महाराष्ट्र), पद्माकर करणकर (२ गुण, महाराष्ट्र) पराभूत विरुद्ध मुक्तानंद पेंडसे (३ गुण, महाराष्ट्र), गुरुबक्ष खन्ना (२ गुण, महाराष्ट्र) पराभूत विरुद्ध आर्य दिवम (३ गुण, मध्य प्रदेश), मयूर गुप्ता (२.५ गुण, महाराष्ट्र) बरोबरी विरुद्ध सर्वज्ञ बालगुडे (२.५ गुण).**

## टीम डेव्हीडचे वादळी शतक

**नवी दिल्ली :** टीम डेव्हिड याने पाचव्या स्थानी बॅटिंगसाठी येत शतक झळकावलं. टीमने ३७ चेंडूत नाबाद २७५.६८ च्या स्ट्राईक रेटने नाबाद १०२ धावांची खेळी केली. विशेष म्हणजे टीमने फक्त चौकार आणि षटकारांच्या मदतीने १७ चेंडूत ९० धावा केल्या. टीमने या शतकी खेळीत ११ षटकार आणि ६ चौकार लगावले. टीम यासह ऑस्ट्रेलियासाठी वेगवान शतक करणारा पहिला फलंदाज ठरला. टीमने याबाबत जोश इंग्लिस याचा रेकॉर्ड ब्रेक केला.

## सिंधूचा टोमोकावर थरारक विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिने जपानच्या टोमोका मियाझाकी हिच्यावर थरारक विजय मिळवीत मचीन ओपन बॅडमिंटनफ या प्रतिष्ठऽच्या बीडब्ल्यूएफ सुपर १००० स्पर्धेत महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

चीनच्या ऑलिम्पिक स्पोर्ट्स सेंटर जिम्नॅशियममध्ये बुधवारी पार पडलेल्या या सामन्यात १५ व्या मानांकित हिंदुस्थानच्या पी. व्ही. सिंधूने आपल्या लढवय्या खेळाचा प्रत्यय देत सहाव्या मानांकित



टोमोका मियाझाकी हिच्यावर २१–१५, ८–२१, २१–१७ असा विजय मिळविला. दुसरया गेममध्ये पिछाडीवर गेल्यानंतरही निर्णायक गेममध्येसिंधूनेसुरुवातीपासूनआघाडी राखत विजयावर शिक्कामोर्तब केले.

पुरुष दुहेरीत जागतिक क्रमांक १२ असलेल्या सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या हिंदुस्थानी जोडीनेही शानदार खेळ करीत आगेकूच केली.

या हिंदुस्थानी जोडीने जपानच्या केन्या मित्सुहाशी आणि हिरोकी ओकामुरा या जोडीचा २१–१३, २१–९ असा सरळ गेम्समध्ये सहज पराभव केला, मात्र महिला दुहेरीत हिंदुस्थानच्या ऋतपर्णा आणि स्वेतपर्णा पांडा या भगिनींना अनुभवी हॉगकॉग चायना जोडीविरुद्ध पराभव स्वीकारावा लागल्याने त्यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

## रसेलने रचला इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिजचा स्फोटक अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेलने आपल्या शेवटच्या आंतरराष्ट्रीय टी–२० सामन्यात आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत फलंदाजी साकारली. टाळ्यांचा कडकडाट, प्रतिस्पर्धी खेळाडूंनी दिलेला गार्ड ऑफ ऑनर आणि आपल्या स्फोटक खेळीने चाहत्यांची जिंकलेली मने जिंकली. या अविस्मरणीय वातावरणात वेस्ट इंडिजचा तुफानी अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अखेरचा सलाम ठोकला. या सामन्यात केवळ वादळी खेळीच केली नाही, तर एक अनोखा विश्वविक्रमही आपल्या नावे केला. ऑस्ट्रेलियाविरुद्धचा दुसरा टी–२० सामना रसेलच्या कारकिर्दीतील अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना होता. या सन्मानाला उत्तर देताना रसेलने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ केला. त्याने केवळ १५ चेंडूंत २ चौकार आणि ४ गगनचुंबी षटकारांसह २४० च्या स्ट्राइक रेटने ३६ धावांची तुफानी खेळी साकारली. ज्या आक्रमक शैलीसाठी तो ओळखला जातो, त्याच शैलीत खेळून त्याने चाहत्यांना एक अविस्मरणीय भेट दिली. आपल्या शेवटच्या सामन्यात ४ षटकार मारताच रसेलने एका अनोख्या विश्वविक्रमाला गवसणी घातली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकही शतक न झळकावता १५० पेक्षा जास्त



षटकार मारणारा तो जगातील एकमेव फलंदाज ठरला आहे. त्याची ही कामगिरी त्याला इतर पॉवर–हिटर्सपेक्षा वेगळे ठरवते.

**दोन्ही संघ तुफान फॉर्मात** | **इंग्लंडसमोर विश्वविजेत्या स्पेनचे कडवे आव्हान**

# ‘युरो’च्या सिंहासनासाठी महासंग्राम!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिला युरो कप २०२५ च्या अंतिम सामन्याची प्रतीक्षा आता संपली असून, विजेतेपदासाठी दोन बलाढ्य संघ निश्चित झाले आहेत. रविवार, २७ जुलै रोजी स्वित्झर्लंडच्या बासेल शहरात होणाऱ्या या महामुकाबल्यात गतविजेत्या इंग्लंडचा सामना पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचलेल्या स्पेनशी होणार आहे. हा सामना २०२३ च्या महिला विश्वचषक अंतिम सामन्याची पुनरावृत्ती असल्याने फुटबॉल चाहत्यांच्या नजरा या लढतीकडे लागल्या आहेत.

उपांत्य फेरीत स्पेनने बलाढ्य जर्मनीवर १–० ने मात करत



ऐतिहासिक विजय मिळवला. निर्धारित वेळेत दोन्ही संघांना गोल करता न आल्याने सामना अतिरिक्त वेळेत गेला. तेव्हा दोन वेळची बॅलन डीऑर विजेती ऐताना बोनमाटी स्पेनसाठी धावून आली. तिने ११३ व्या मिनिटाला निर्णायक गोल करत संघाला प्रथमच युरो कपच्या अंतिम फेरीत पोहोचवले. विशेष म्हणजे, स्पर्धे पूर्वी काही दिवस बोनमाटी व्हायरल मेंदुज्वरामुळे रुग्णालयात दाखल होती; पण तिने मैदानावर परतत संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. दुसरीकडे, लायनेसेस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इंग्लंडच्या संघाने उपांत्य फेरीत इटलीचा २–१ ने पराभव करत दिमाखात अंतिम फेरी गाठली. कर्णधार लिया विल्यमसनच्या नेतृत्वाखालील इंग्लंडचा संघ सलग दुसर्यांदा युरो कप जिंकण्यासाठी मैदानात उतरेल. इंग्लंडसाठी संपूर्ण स्पर्धेत फॉरवर्ड बेथ मीड आणि एला टूने यांनी धारदार आक्रमण केले आहे, तर गोलकीपर मेरी अर्प्सने अभेद्य बचाव करत संघाला विजय मिळवून दिले आहेत. स्पेनचा संघ गेल्या दोन वर्षांपासून तुफान फॉर्मात आहे. त्यांनी २०२३ मध्ये विश्वचषक आणि त्यानंतर नेशन्स कप जिंकला आहे. आता युरो कप जिंकून विजेतेपदाची हॅट्रिक पूर्ण करण्याचा त्यांचा मानस असेल. तर इंग्लंड विश्वचषकातील पराभवाचा वचपा काढून आपले युरोवरील वर्चस्व कायम राखण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे हा अंतिम सामना केवळ एक स्पर्धा नव्हे, तर दोन कट्टर प्रतिस्पर्धकांमधील प्रतिष्ठेची लढाई ठरणार आहे.

## निवडक

### चौलमध्ये रंगणार नारळ फोडी स्पर्धा

**अलिबाग :** शेकाप राज्य सोशल मिडीया प्रमुख तथा प्रवक्त्या चित्रलेखा नृपाल पाटील पुरस्कृत चौल विभाग नारळ फोडी मित्रमंडळातर्फे रविवार (दि.२७) जुलै रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास नारळ फोडीच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. चौल नाका येथील मराठी शाळेच्या पटांगणात ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते होणार असल्याची महिती आयोजकांनी दिली. या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धेकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### मनालीचे मल्लखांब स्पर्धेमध्ये यश

**श्रीवर्धन :** एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या खेळ आणि शारीरिक शिक्षण विभागामधून आंतरविद्यापीठ खेळ मल्लखांब स्पर्धेकरिता श्रीवर्धनमधील महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालयाची तृतीय वाणिज्यमधील विद्यार्थीनी मनाली शैलेंद्र ठाकूर हिची निवड करण्यात आली होती. ही स्पर्धा आंतरविद्यापीठाच्या मल्लखांब स्पर्धा एलएनसीटी विद्यापीठ, भोपाळ येथे आयोजित केली होती. या मल्लखांब स्पर्धेमध्ये



तिने सहभाग घेऊन यश संपादित करत महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय व एस. एन. डी. टी.महिला विद्यापीठाचे नाव उज्वल केले आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.पी. राणे, महाविद्यालयाचे क्रीडाप्रमुख सुमीत चव्हाण तसेच महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी तिचे मिळविलेल्या या यशाबद्दल अभिनंदन केले आहे.



### ऑस्ट्रेलिया मालिका जिंकण्यासाठी सज्ज

**नवी दिल्ली :** पाहुण्या ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने यजमान वेस्ट इंडिज क्रिकेट संघाचा कसोटी मालिकेत ३–० अशा फरकाने धुव्वा उडवला. ऑस्ट्रेलियाने यासह विंडीज दौऱ्याची चाबूक सुरुवात केली. त्यानंतर आता उभयसंघात पाच सामन्यांची टी –२० मालिका खेळवण्यात येत आहे. ऑस्ट्रेलियाने कसोटीनंतर टी –२० मालिकेतही विजयी तडाखा कायम ठेवला. ऑस्ट्रेलियाने ५ सामन्यांच्या मालिकेत सलग दोन सामने जिंकले आणि मालिका विजयाचा दावा ठोकला आहे. त्यामुळे आता ऑस्ट्रेलिया सलग तिसरा सामना जिंकून मालिका विजयासाठी सज्ज झाली आहे. तर दुसऱ्या बाजूला विंडीजसाठी हा तिसरा सामना करो या मरो असा आहे. त्यामुळे तिसऱ्या सामन्यात कोणता संघ जिंकणार? याची उत्सूकता क्रिकेट चाहत्यांना आहे.



### आफ्रिकेसमोर न्यूझीलंडचे आव्हान

**हरारे :** झिंबाब्वेत १४ जुलैपासून त्रिकोणी मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे. या त्रिकोणी मालिकेत यजमान झिंबाब्वेसह, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका आमनेसामने होते. या मालिकेतील साखळी फेरीतील सहावा आणि शेवटचा सामना हा २४ जुलैला खेळवण्यात आला. न्यूझीलंडने यजमान झिंबाब्वेचा धुव्वा उडवत विजयी चौकार लगावला. झिंबाब्वेची यासह या मालिकेतील विजयाची पाटी कोरीच राहिली. त्यानंतर आता या मालिकेतील अंतिम सामन्यात न्यूझीलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका आमनेसामने असणार आहेत. त्यामुळे अंतिम सामन्यात कोणता संघ विजय मिळवून मालिकेवर नाव कोरणार याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागून आहे. दक्षिण आफ्रिका अंतिम सामना शनिवारी २६ जुलैला हरारे स्पोर्ट्स क्लब येथे खेळवण्यात येणार आहे.

### प्रणॉयचा झुंजार विजय

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा स्टार खेळाडू एच. एस. प्रणॉयने पिछाडीवरून जबरदस्त पुनरागमन करत चीन ओपन बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत धडक दिली. बीडब्ल्यूएफ सुपर १००० दर्जाच्या या स्पर्धेत त्याने ही कामगिरी केली. जागतिक क्रमवारीत ३५ व्या स्थानी असलेल्या एच. एस. प्रणॉयने १८ व्या मानांकित जपानच्या कोकी वतानाबे याच्यावर ८–२१, २१–१६, २३–२१ असा थरारक विजय मिळवला. एक तासाच्या आत त्याने हा संघर्षमय सामना जिंकला. पहिला गेम सहज गमावल्यानंतर दुसरया गेममध्ये प्रणॉयने लय सापडवत सामना बरोबरीत आणला. निर्णायक तिसऱ्या गेममध्ये तो ९ गुणांनी पिछाडीवर होता, मात्र, त्यानंतर पाच मॅच पॉइंट वाचवत त्याने विजयावर शिक्कामोर्तब करत प्रेक्षकांना अचंबित केले. आता आगामी लढतीत प्रणॉयची लढत सहाव्या मानांकित चिनी तैपेईच्या चोऊ तिएन चेन याच्याशी होणार आहे.दरम्यान, अन्य सामन्यांमध्ये लक्ष्य सेन, अनुपमा उपाध्याय यांच्यासह रोहन कपूर–ऋत्विका गड्डे या मिश्र दुहेरी जोडीला निर्णायक गेमपर्यंत झुंज दिल्यानंतर पराभवाचा सामना करावा लागला आहे. लक्ष्य सेनला सलामीच्या लढतीत चीनच्या ली शिफेंग याने १४–२१, २४–२२, २१–११ असे पराभूत केले. महिला एकेरीच्या लढतीत अनुपमा उपाध्याय हिला चीनच्या लिन हिसयांग ती हिने २३–२१, २१–११, २१–१० असे हरवले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)